नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २८४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## अर्धापूरात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

अर्धापूर : (स. गांवकरी)

दुष्काळी परिस्थितीमुळे पिकांचे झालेल्या अतोनात नुकसानीची पाहणी करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट शेतात जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली.अडचणीत सापडलेल्या बळीराजाशी दि.२८ सोमवारी रोजी संवाद साधत महसूलमंत्र्यांना शेतकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले.

दुष्काळामुळे तालुक्यातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी संकटात सापडला आहे. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी आकाश साखरे यांच्या शेतात जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांना धीर देत म्हणाले की संकटसमयी शासन-प्रशासन पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. तसेच परिस्थितीचे निवारण करण्यासाठी व बाधित शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले.

या पाहणी दौऱ्यावर खा. अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे,आ. ॲड. श्रीजया चव्हाण, भाजप नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख,जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे,माजी सभापती किशोर स्वामी, सभापती संजय देशमुख लहानकर, माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणकर,नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे,माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, संचालक निळकंठ मदने, शहराध्यक्ष योगेश हाळदे, संचालक व्यंकटराव साखरे, उपनगराध्यक्ष मुक्तेदर पठाण, डॉ.विशाल लंगडे, अभिषेक गुरखेल, बाबुराव लंगडे,प्रल्हादराव माटे, सोनाजी सरोदे,सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब,गोविंद कदम यांची प्रमुख



उपस्थिती होती.

तसेच प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी महेश पाटील, तहसीलदार रेणूकादास देवणीकर, गटविकास अधिकारी यु.डी.तोटावाड, सहकार अधिकारी अरुणाताई केंद्रे, पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर, उपविभागीय अभियंता सिद्धेश्वर मिना, अभियंता अमोल नरवाडे, शेतकरी ज्ञानेश्वर माटे, शिवशंकर वाघमारे, संभाजी माटे, साईनाथ लंगडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नुकसान झालेल्या सोयाबीनची पाहणी करण्यासाठी नांदेड नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील शेतकरी आकाश साखरे यांच्या शेतात येणार असल्याने काही अति हुशार अधिकाऱ्यांनी रॅम्प तयार केला होता. पण याची कुणकुण महसूल मंत्री बावनकुळे यांना लागली होती त्यांनी त्या तयार केलेल्या रॅम्पवर न जाता शेतकरी ज्या रस्त्याने येजा करतात त्या रस्त्याने जाऊन अतिशोक्ती करणाऱ्या महसूलच्या अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.




## गणरायाच्या चरणी 'दैनिक समर्थ गांवकरी'चा अंक अर्पण

नवी मुंबई: (स. गांवकरी)

गणेशोत्सवाच्या पावन वातावरणात नवी मुंबईतील वाशी पोलीस ठाण्यात गणरायाच्या चरणी दैनिक समर्थ गांवकरीचा अंक अर्पण करून दर्शन घेण्यात आले. दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांनी श्री गणेशाचे दर्शन घेतल्यानंतर वाशी पोलीस ठाण्याच्या एपीआय शारदा देशमुख यांना दैनिक समर्थ गांवकरीचा अंक भेट देऊन त्याचे प्रकाशन केले.

यावेळी क्राईम रिपोर्टर महेश जाधव तसेच समाजसेविका झोया मॅडम उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी दैनिक समर्थ गांवकरीच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच सकारात्मक आणि सामाजिक उपक्रमांना प्रसिद्धी देण्याच्या कार्याचे कौतुक केले. तसेच दैनिकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सवाच्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात बाप्पाच्या चरणी अंक अर्पण करून त्यानंतर अंकाचे प्रकाशन झाल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. श्री गणरायाच्या आशीर्वादाने दैनिक समर्थ गांवकरीची पत्रकारितेतील वाटचाल अधिक प्रभावी आणि समाजाभिमुख होवो, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## थोडक्यात...

### डांगमध्ये काँग्रेसचा आक्रोश

डांग (स. गांवकरी) : डांग जिल्हा काँग्रेसच्या वतीने सोमवारी आहवा येथे निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने आहवा येथील जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जमले होते. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत कार्यकर्त्यांनी धरणे आंदोलन करून जोरदार घोषणाबाजी केली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीचा निषेध करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्ते हातात विविध पोस्टर्स व बॅनर घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर दाखल झाले. अनेक कार्यकर्त्यांनी हाताला काळ्या रिबन बांधून निषेध नोंदविला. यावेळी "व्होट चोर, गादी छोड" यासह विविध घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी निवडणूक प्रक्रिया तसेच निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धती विरोधात आक्रोश व्यक्त करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी हे दहन रोखण्याचा प्रयत्न केला; मात्र आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी पुतळ्याचे दहन केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आहवा जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते जमल्याने पोलिसांनी परिस्थितीवर लक्ष ठेवले.

### उत्पादित चारा जिल्ह्याबाहेर वाहतूक करण्यास बंदी

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी जिल्ह्यात उत्पादित होणारा सर्व प्रकारचा चारा व मुरघास जिल्ह्याबाहेर किंवा अन्य राज्यात वाहतूक करून विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आदेश जारी केला. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या एकत्रित माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील पशुधनास अंदाजे पुढील 120 दिवस म्हणजे डिसेंबर 2026 अखेरपर्यंत पुरेल इतका चारा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



## समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंची खो-खोमध्ये दमदार कामगिरी

आळेफाटा : (स. गांवकरी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे यांच्या वतीने आयोजित जुन्नर तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेज बेल्हे खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पाच पदकांची कमाई केली. नुकत्याच पार पडलेल्या स्पर्धेत समर्थच्या खेळाडूंनी विविध वयोगटांत चमकदार कामगिरी केली.

या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुले मुली द्वितीय क्रमांक, १९ वर्षे खालील मुले मुली द्वितीय क्रमांक व १४ वर्षाखालील मुली तृतीय क्रमांक पटकावला. या यशामुळे समर्थ गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या एकूण पाच संघांनी पदकांची कमाई केली.

स्पर्धेतील सामन्यांमध्ये समर्थच्या खेळाडूंनी जिद्द, आत्मविश्वास, शिस्त, चपळता आणि सांघिक समन्वय यांचे प्रभावी प्रदर्शन केले. प्रतिकूल परिस्थितीतही शेवटपर्यंत झुंज देत खेळाडूंनी आपल्या संघासाठी उत्कृष्ट कामगिरी केली. नियमित सराव आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना हे यश मिळाले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जि.प. सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर, समर्थ गुरुकुल चे प्राचार्य सतीश कुऱ्हे प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांच्यासह संस्थेतील पदाधिकारी व शिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## जिल्हा बँकेची वार्षिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

जिल्हा बँकेची कर्ज वसुली गतवर्षीच्या ५१.४३ टक्क्यांवरून यंदा ४५.४४ टक्क्यांवर घसरली आहे. वसुली कमी झाल्यामुळे भविष्यात बँकेला अडचणी येऊ शकतात, त्यामुळे सभासदांनी नियमित कर्जपरतफेड करणे आवश्यक आहे, अशी भूमिका प्रशासकांनी वार्षिक सभेत मांडली. बँकेचा एकूण एनपीए ९६९.६८ कोटी (१२.५५ टक्के) असला, तरी निव्वळ एनपीए निरंक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेच्या सभासदांना दहा टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे सभेच्या अजेंड्यावरील सहा विषयांना सहा माजी संचालक व पदाधिकारी आलटून पालटून सूचक आणि अनुमोदक राहिले. कर्जवसुली घटल्याने चिंता व्यक्त करण्यात आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सध्या प्रशासक राज असून, बँकेचा निवडणूक कार्यक्रमही सुरू आहे.अशा स्थितीत बँकेची ६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नियोजित वेळी सोमवारी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात प्रशासक संगीताताई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी माजी चेअरमन चंद्रशेखर घुले, माजी व्हाईस चेअरमन माधवराव कानडे, संचालक सीताराम गायकर, अंबादास पिसाळ,




राजेंद्र नागवडे, गणपत सांगळे, रामदास वाघ. श्रीमती गितांजली शेळके तसेच जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे आदी उपस्थित होते. मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे; सन २०२५-२६ मधील कामकाजाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रक आदी हिशेबाची पत्रके व नफावाटणी, तसेच २०२६-२७ साठीचे उत्पन्न-खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे; वैधानिक तपासणी; लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती; प्रशासकांनी शिफारस केल्याप्रमाणे २०२६-२७ साठी लोकल ऑडिटरची निवड; आणि ऐनवेळचे विषय आदी विषय अजेंड्यावर होते.

अहवालानुसार, ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला ६८.९६ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. भागधारकांना १० टक्के लाभांश देण्यासाठी ३९.०३ कोटी रुपयांची शिफारस करण्यात आली आहे. बँकेच्या ठेवी ११ हजार ३११ कोटी, कर्जे येणे बाकी ७ हजार ७२६ कोटी, तर खेळते भांडवल १५ हजार ३६७ कोटी रुपये आहे. बँकेला वैधानिक लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळाला आहे.

दुसरीकडे, कर्ज वसुलीचे प्रमाण गतवर्षीच्या ५१.४३ टक्क्यांवरून यंदा ४५.४४ टक्क्यांवर घसरल्याने प्रशासकांनी चिंता व्यक्त केली. वसुली कमी झाल्यास भविष्यात बँकेला अडचणी येऊ शकतात, त्यामुळे सभासदांनी नियमित कर्जपरतफेड करावी, असे आवाहन करण्यात आले. बँकेचा एकूण एनपीए ९६९.६८ कोटी रुपये (१२.५५ टक्के) असला, तरी निव्वळ एनपीए निरंक असल्याचे सांगण्यात आले. यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल शेळके विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष लालु शेठ दळवी भारतीय जनता पक्षाचे सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष भाऊसाहेब वाकचौरे पाटील पांगरी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन भानुदास डोंगरे अकोले खादी ग्रामोद्योग संघाच्या अध्यक्ष मंगलाताई शेलार. वाघापूर सोसायटीचे सचिव संजय फुलसुंदर. यासह नगर जिल्ह्यातील 14 तालुक्यातील संस्थांचे ठराव प्रतिनिधी उपस्थित होते.

## संरक्षित शेतीच्या अनुदानासाठी शेतकरी आक्रमक; एनएचबी कार्यालयावर मोर्चा

### ५० टक्के अनुदान पूर्ववत करण्यासह जाचक अटी रद्द करण्याची मागणी

पुणे : (स. गांवकरी)

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या (एनएचबी) अंतर्गत संरक्षित शेतीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्क्यांवरून ३५ टक्के कपात करण्यात आल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. अनुदानातील कपात तसेच नव्या मार्गदर्शक तत्त्वांमधील जाचक अटी-शर्ती रद्द करून पूर्वीप्रमाणे ५० टक्के अनुदान सुरू करावे, या मागणीसाठी शेतकरी, फूल उत्पादक आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी पुणे येथील राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढला.

दिल्ली येथे १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळाच्या कार्यालयासमोर आणि १६ सप्टेंबर रोजी कृषी भवनासमोर आंदोलन केल्यानंतर शेतकरी संघटना आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रात आंदोलनाची सुरुवात केली. पवना संस्कृती एफपीसी, इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (इग्मा), महाराष्ट्र फूल उत्पादक संघ आणि पुणे




फूल उत्पादक कंपनीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी एनएचबीच्या उपसंचालकांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

या आंदोलनात मावळ तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर, फूल उत्पादक संघाचे सुमारे ४०० शेतकरी, इग्माचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, राष्ट्रीय सहसचिव तथा महाराष्ट्र अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे, नितीन जगताप, रोशन पिंगळे, जयदीप ननवरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

संरक्षित शेतीमध्ये पॉलीहाऊस आणि शेडनेट हाऊस उभारण्यासाठी शेतकरी स्वतःची जमीन, भांडवल तसेच बँक कर्जाची मोठी गुंतवणूक करतात. अशा परिस्थितीत अनुदान ५० टक्क्यांवरून ३५ टक्के करण्यात आल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर अनुदानासाठी लागू करण्यात आलेल्या विविध अटींमुळे नवीन प्रकल्प उभारण्यास शेतकरी आणि उद्योजकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

यापूर्वी मंजूर झालेल्या काही प्रकल्पांचे अनुदानही प्रलंबित असल्याने शेतकरी तसेच हरितगृह उभारणीशी संबंधित उद्योग अडचणीत आले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा पुनर्विचार करून प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली.

दिल्लीतील दोन दिवसांच्या आंदोलनानंतरही अपेक्षित निर्णय न झाल्याने देशातील विविध राज्यांमध्ये आंदोलन करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात एनएचबीच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. देशातील सुमारे दहा राज्यांमध्ये अशाच प्रकारची आंदोलने करण्यात आल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

धोरणांमध्ये बदल करण्यापूर्वी प्रक्रियेत असलेल्या प्रकल्पांचा आणि शेतकऱ्यांच्या गुंतवणुकीचा विचार करणे आवश्यक आहे. नवीन नियमांमुळे आधीच गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांवर अनपेक्षित आर्थिक भार पडू नये, जुन्या नियमांनुसार सुरू झालेल्या प्रकल्पांना संरक्षण मिळावे आणि फूल निर्यातीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर यांनी केली.

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

१. २१ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेले सुधारित मार्गदर्शक तत्त्वांचे परिपत्रक मागे घ्यावे.
२. पॉलीहाऊस आणि शेडनेट हाऊससाठीचे आर्थिक सहाय्य पूर्वीप्रमाणे ५० टक्के करावे.
३. पॉलीहाऊस व शेडनेट हाऊस उभारणीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करावा.
४. सुधारित नियम लागू होण्यापूर्वी सादर केलेल्या अर्जांवर तसेच जीओसी परवानगी मिळालेल्या प्रकल्पांवर जुन्या नियमांनुसार कार्यवाही करावी.
५. 'एक कुटुंब–एक लाभार्थी' या अटीचा पुनर्विचार करून स्वतंत्र कुटुंबव्यवस्था असलेल्या दोन भावांच्या स्वतंत्र प्रकल्पांना स्वतंत्रपणे लाभ देण्याची तरतूद करावी.
६. दहा हजार रुपयांपेक्षा अधिक निवृत्तीवेतनाशी संबंधित पात्रता अटीचा पुनर्विचार करून शेती करणाऱ्या पात्र निवृत्त जवान तसेच केंद्र व राज्य शासनातील निवृत्त कर्मचाऱ्यांना योजनेपासून अनावश्यकपणे वंचित ठेवू नये.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

# सर्वांना समान अधिकार कधी?

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी यावरून भेदभाव होऊ नये, ही आपल्या लोकशाहीची मूलभूत भूमिका आहे. मात्र, संविधानातील ही समानतेची हमी आणि प्रत्यक्ष जीवनातील वास्तव यांच्यात आजही मोठी दरी दिसून येते. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो—सर्वांना समान अधिकार प्रत्यक्षात कधी मिळणार?

कायद्याच्या नजरेत प्रत्येक नागरिक समान असला, तरी समाजातील वास्तव अनेकदा वेगळे चित्र दाखवते. आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्तीला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचणे तुलनेने सोपे जाते; मात्र गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांना याच मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. समान अधिकार कागदावर असणे आणि तो अधिकार प्रत्यक्षात उपभोगता येणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

समानतेचा अर्थ प्रत्येकाला अगदी सारखी परिस्थिती देणे असा नाही. ज्यांना ऐतिहासिक, सामाजिक किंवा आर्थिक कारणांमुळे संधी मिळाल्या नाहीत, त्यांना पुढे आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे हीदेखील समानतेचीच प्रक्रिया आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या योजना, शिक्षणातील संधी, आर्थिक मदत आणि दुर्बल घटकांसाठीच्या विविध तरतुदी यांचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र या योजनांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचतो आहे का, याची सातत्याने तपासणी होणे आवश्यक आहे.

आजही अनेक ठिकाणी महिलांना समान संधी, कामाच्या ठिकाणी समान वागणूक आणि सुरक्षित वातावरणासाठी संघर्ष करावा लागतो. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळण्याचे आव्हान आहे. दिव्यांग नागरिकांसाठी अनेक सुविधा उपलब्ध असल्या, तरी त्या प्रत्यक्षात किती सुलभ आहेत, हा प्रश्न कायम आहे. सामाजिक भेदभावाचे विविध प्रकार अद्याप अस्तित्वात आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत; समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन आवश्यक आहे.

समान अधिकार म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे. सन्मानाने जगण्याचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, आरोग्याचा अधिकार, रोजगाराच्या समान संधी, न्याय मिळण्याचा अधिकार आणि सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार यांचा त्यात समावेश होतो. एखाद्या व्यक्तीची आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती तिच्या मूलभूत अधिकारांच्या आड येत असेल, तर आपल्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.



लोकशाहीची खरी ताकद निवडणुकांमध्येच नाही, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय आणि समान संधी पोहोचण्यात आहे. शासनाने योजना आखाव्यात, प्रशासनाने त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि नागरिकांनीही भेदभावाच्या मानसिकतेला नकार द्यावा. कायदा मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई जितकी आवश्यक आहे, तितकीच कायद्याचे पालन करणाऱ्या सामान्य नागरिकाला न्याय मिळण्याची खात्री देणेही आवश्यक आहे.

आज आपण विकास, आधुनिकता आणि प्रगतीच्या मोठमोठ्या गोष्टी करतो. मात्र या प्रगतीचा लाभ समाजातील प्रत्येक घटकाला समान प्रमाणात मिळत नसेल, तर विकासाची संकल्पना अपुरी ठरते. समान अधिकार ही केवळ संविधानातील तरतूद नसून प्रत्येक नागरिकाच्या जगण्याचा आधार आहे.

म्हणूनच आता प्रश्न फक्त "समान अधिकार आहेत का?" असा न राहता "हे अधिकार प्रत्येक नागरिकापर्यंत प्रत्यक्षात पोहोचले आहेत का?" असा असला पाहिजे.

ज्या दिवशी गरीब आणि श्रीमंत, महिला आणि पुरुष, ग्रामीण आणि शहरी, सक्षम आणि दिव्यांग, वंचित आणि प्रगत अशा प्रत्येक नागरिकाला न्याय मिळण्याची समान हमी प्रत्यक्ष अनुभवता येईल, त्या दिवशीच आपण खऱ्या अर्थाने समानतेच्या समाजाकडे वाटचाल केली असे म्हणता येईल. समान अधिकार हा उपकार नाही; तो प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक हक्क आहे. प्रश्न फक्त एवढाच—तो हक्क प्रत्येकापर्यंत पोहोचणार कधी?

# थोडक्यात पण महत्वाचे

## चाभरा शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात गाय व पोटातील वासरू ठार

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील चाभरा शिवारात सरपंच सदाशिव विश्वनाथ चाभरकर यांच्या शेतातील आखाड्यावर बांधलेली गाईवर बिबट्याने हल्ला करून गाईच्या पोटातील वासरू बाहेर काढून बिबट्याने हल्ला करून गाईसहीत होणारा वासराच्या फडश्या पाडल्याची घटना



घडली दि.२८ सोमवारी रोजी सकाळी उघडकीस आली आहे. चाभरा शिवारात बिबट्याचा नेहमीच वावर असतो सात वर्षांपूर्वी चाभरा शिवारात बिबट्या विहिरीत पडला होता. शेतकऱ्यांच्या गाईवर बिबट्याचा हल्ल्यामुळे गाईचा व होणारा वासराच्या बळी बिबट्याने घेतला आहे. बिबट्याचा वाढत्या हल्ल्यामुळे चाभरा व परिसरातील शेतकऱ्या मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याचा वन विभागाने बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या जनावराचे होणारे नुकसान टाळावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. वन विभाग काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले आहे. सोमवारी सायंकाळी ४ वा. च्या सुमारास रोडगी परिसरात पट्टेदार वाघ दिसल्याची जोरदार चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे.



## तळेगाव सज्जा तामसा महसूल मंडळात घ्यावा: भागवत देवसरकर

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील तळेगाव हे गाव सध्या बरडशेवाळा महसूल मंडळात आहे. भौगोलिक गैरसोय लक्षात घेता हे गाव तामसा महसूल मंडळाला जोडावे, अशी मागणीचे निवेदन राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांना भाजपा हदगाव पूर्व मंडळाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. तळेगाव ते बरडशेवाळा अंतर २० किमी असून जाण्या-येण्याची गैरसोय आहे. तर तामसा हे गावापासून अवघ्या ४-५ किमी अंतरावर आहे. शेतीविषयक कामे, तलाठी कार्यालय, बाजारपेठ, दवाखाना सर्व कामांसाठी नागरिकांना तामसा येथे जावे लागते. त्यामुळे महसूल मंडळ बदलणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे,या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तळेगाव गाव तामसा मंडळाला जोडावे, अशी मागणी यावेळी भागवत देवसरकर यांनी केली आहे.



## प्रवीण वाघमारे यांच्या स्मृतिदिना निमित्त ४० रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

भोकर (स. गांवकरी) : स्मृतीशेष प्रवीण वाघमारे यांच्या ११ व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त डॉक्टर असोसिएशन व केमिस्ट असोसिएशन, भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालय, भोकर येथे २८ सप्टेंबर रोजी मोफत शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिरात विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या एकूण ४० रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, बाह्य संपर्क अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण तसेच रुग्ण कल्याण समितीचे सदस्य डॉ. साईनाथ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिरात ६ रुग्णांवर अपेंडिक्स, ५ हर्निया रिपेअर, ४ हायड्रोसिल, ५ फायब्रोॲडिनोमा आणि १९ रुग्णांवर लहान गाठी काढण्याच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच एका लहान मुलावर फायमोसिसची शस्त्रक्रिया करण्यात आली. या शस्त्रक्रियांसाठी नांदेड येथून सर्जन डॉ. संतोष अंगरवार, डॉ. जीवन पावडे, डॉ. पांडुरंग पावडे, डॉ. भास्कर आवटी तसेच भूलतज्ज्ञ डॉ. बाळासाहेब बिराडे, डॉ. आशिष कदम आणि डॉ. अस्मिता भालके यांनी सेवा दिली. शिबिर यशस्वी करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, इन्चार्ज सिस्टर पवार, नर्सिंग स्टाफ, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी अत्रीनंदन पांचाळ, औषध निर्माण अधिकारी गंगामोहन शिंदे यांच्यासह आरोग्य सेवक व सफाई कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून विशेष परिश्रम घेतले. मोफत शस्त्रक्रिया शिबिरामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.



## कुमशेत येथून तुळजाभवानी पलंगाचा कुकडी नदीच्या नदीपात्रातून अनोखा प्रवास

शिवनेरी : (स. गांवकरी)

घोडेगाव येथून दरवर्षी निघणारा तुळजाभवानी मातेचा पलंग ५५ दिवसाचा पायी प्रवासात प्रथम कुमशेत येथील कुकडी नदीच्या पात्रातून अनोखा प्रवास केला जातो.

कुमशेत गावातील आई तुळजाभवानी पलंग समस्त ग्रामस्थ, जय अंबिका प्रासादिक भजनी मंडळ व पारंपारिक वाद्यसह वाजत गाजत प्रथम कुकडी नदीच्या पात्रातून पलंग उचलून पैलतीरी हापूस मार्गे प्रस्थान केले जाते.

राजमाता जिजाऊ या पलंगाच्या दर्शनाला जुन्नर मध्ये येत असतात. त्यामुळे या पलंगोत्सवाला जुन्नर तालुक्यात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आई तुळजाभवानी पलंग ५५ दिवसाच्या प्रवासात १६ दिवसाचा मुक्काम जुन्नर तालुक्यात असतो. जुन्नर शहरातील तेळीवण तेली सभागृहात पलंग दहा दिवस असतो. निमदरी, तीर्थक्षेत्र कुमशेत, हापूस बाग, नारायणगाव, आळे, राजुरी या ठिकाणी प्रत्येक गावात प्रत्येकी एक दिवस मुक्काम असतो.

जुन्नर तालुक्यातील तीर्थक्षेत्र कुमशेत, अहिल्यानगर - व बीड या दोन जिल्ह्यांच्या सीमा भागातून जाताना मेहकर नदीच्या पात्रातून ७ वेळा पलंग नदीच्या पहिल्या तेरी नेला जातो. त्यानंतर आष्टी तालुक्यातील तलवार नदीतून, बार्शी तालुक्यातील नारी गावातून बेडका नदीपात्रातून पलंगाचा प्रवास होतो. प्रत्येक वर्षी या पद्धतीने वेगवेगळ्या भागातून १० वेळा हा पलंग नदीपत्रातून पैलतीर अनोखा प्रवास होत असल्याची माहिती तुळजाभवानी देवीच्या पालगांचे मानकरी पलंगे यांनी दिली.

## पुण्यातील स्टार्टअपचा कान्समध्ये (फ्रान्स) गौरव

पुणे : (स. गांवकरी)

वृद्धांच्या गरजा लक्षात घेऊन उत्पादने डिझाइन करणाऱ्या पुण्यातील 'हाऊस ऑफ टुमारो' या स्टार्टअपला 'इनलू' या उत्पादनाच्या डिझाइनसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आले आहे. 'इनलू' ही कोणत्याही व्यक्तीला आरामात वापरता येईल अशा प्रकारे तयार करण्यात आलेली टॉयलेट अटॅचमेंट आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना टॉयलेटमध्ये बसणे आणि उठणे सोपे होते तसेच त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींनाही मदत होते. वृद्धांच्या गरजेनुसार बाथरूममध्ये मोठे आणि खर्चिक बदल करण्याची गरजही 'इनलू'मुळे टाळता येते.

आर्किटेक्ट ऐश्वर्या एडाखे आणि प्रॉडक्ट डिझायनर शगुन मालवीय यांनी 'हाऊस ऑफ टुमारो'ची स्थापना केली आहे. चांगल्या प्रकारे वृद्धत्वाकडे जाणे हा केवळ वैद्यकीय विषय नसून डिझाइनशीही संबंधित विषय आहे, अशी 'हाऊस ऑफ टुमारो'ची भूमिका आहे. कंपनीचे प्रमुख उत्पादन 'इनलू' हे ज्येष्ठ नागरिकांना पुन्हा स्वावलंबी होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आले आहे. कमोडला जोडता येणारे सहाय्यक उपकरण किंवा बाथरूममध्ये वापरता येणारी पोर्टेबल टॉयलेट चेअर अशा दोन्ही प्रकारे त्याचा वापर करता येतो.



ऐश्वर्या एडाखे म्हणाल्या, "वृद्धांचे जीवन अधिक सुलभ करणारे नाविन्यपूर्ण उत्पादन म्हणून 'इनलू'ला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उत्पादक, व्यावसायिक क्षेत्र आणि कुटुंबांसह जगभरातील सर्व संबंधित घटकांकडून या उत्पादनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे."

कान्समधील पॅले दे फेस्टिव्हल्स येथे आयोजित सिल्व्हरइको अँड एजिंग वेल इंटरनॅशनल अवॉर्ड्स 2026मध्ये पुण्यातील या स्टार्टअपला ऑटोनॉमी अँड इंडिपेंडंट लिव्हिंग श्रेणीतील 'बेस्ट इनिशिएटिव्ह' पुरस्कार मिळाला आहे. यंदा 18व्या वर्षात पदार्पण केलेल्या सिल्व्हरइको अँड एजिंग वेल इंटरनॅशनल अवॉर्ड्सचे आयोजन युरोपमधील सिल्व्हर इकॉनॉमी क्षेत्रातील आघाडीचे व्यासपीठ असलेल्या SilverEco.orgकडून करण्यात येते. यापूर्वी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन पॅरिस आणि टोकियो येथे करण्यात आले होते, तर 2021पासून हा सोहळा कान्स येथे आयोजित करण्यात येत आहे. युरोप, अमेरिका आणि आशियातील 19हून अधिक देशांमधून या पुरस्कारासाठी प्रवेशिका येतात.

या पुरस्कारापूर्वी 'हाऊस ऑफ टुमारो'ला मानवकेंद्री डिझाइनमधील योगदानासाठी डॉन नॉर्मन डिझाइन अवॉर्ड (DNDA) – इंडियानेही गौरवण्यात आले होते. त्यामुळे लागोपाठ दोन पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या स्टार्टअप्समध्ये 'हाऊस ऑफ टुमारो'चा समावेश झाला आहे.

### हाऊस ऑफ टुमारोविषयी

'हाऊस ऑफ टुमारो' हा ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्पादने विकसित करणारा पुण्यातील डिझाइन स्टुडिओ आहे. कंपनीचे प्रमुख उत्पादन 'इनलू' हे ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात अधिक स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेले टॉयलेट अटॅचमेंट आहे. आर्किटेक्ट ऐश्वर्या एडाखे आणि प्रॉडक्ट डिझायनर शगुन मालवीय या पहिल्या पिढीतील उद्योजकांनी या कंपनीची सह-स्थापना केली आहे.

## Ai+ Smartphone ने सणासुदीत आणले फ्लॅगशिप दर्जाचे तंत्रज्ञान

महाराष्ट्र: (स. गांवकरी)

दिवाळीपूर्वीच्या सणासुदीच्या खरेदीचा उत्साह लक्षात घेत Ai+ Smartphone ने स्मार्टफोन, टॅबलेट आणि उत्पादकता-केंद्रित उपकरणांच्या श्रेणीत तीन नवीन उत्पादने सादर केली आहेत. कंपनीने Pulse 2 FE, NovaTab आणि Nova LapTab ही तीन उपकरणे बाजारात आणत आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार केला आहे. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि दैनंदिन कामकाजाच्या विविध गरजा लक्षात घेऊन ही उपकरणे विकसित करण्यात आली आहेत.




देशभरातील ग्राहक सणासुदीच्या काळात नवीन तंत्रज्ञानाची खरेदी, उपकरणांचे अद्ययावतीकरण आणि भेटवस्तूंची खरेदी करण्यासाठी सज्ज होत असताना Ai+ Smartphone ने ही नवीन उत्पादने सादर केली आहेत. पहिल्यांदा स्मार्टफोन घेणारे ग्राहक, कनेक्टेड शिक्षणासाठी उपकरण शोधणारे विद्यार्थी तसेच मोठ्या पडद्यावर मनोरंजन आणि कामकाजाचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी या नव्या श्रेणीत विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

प्रत्येक उपकरणाची रचना विशिष्ट गरजा लक्षात घेऊन करण्यात आली आहे. 'First Step to a Smarter World' या संकल्पनेअंतर्गत सादर करण्यात आलेला Pulse 2 FE हा पहिल्यांदा स्मार्टफोन घेणाऱ्या किंवा नवीन उपकरणावर अद्ययावत होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. तर NovaTab आणि Nova LapTab यांच्या माध्यमातून कंपनीने ५जी टॅबलेटच्या क्षेत्रात प्रवेश केला आहे. मोठी स्क्रीन, ५जी जोडणी आणि शिक्षणावर विशेष भर देणारा NovaTab विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरण्याचा कंपनीचा दावा आहे. Nova LapTab मध्ये १३.२ इंचांचा मोठा पडदा, लेखणीचा आधार आणि जोडता येणारा की-बोर्ड देण्यात आला असून त्यातून संगणकासारखा कामाचा अनुभव मिळतो.

संपूर्ण उत्पादन श्रेणीमध्ये Ai+ Smartphone ने Android 16 आधारित nxtQ OS, उच्च ताज्या दराचे पडदे, मोठ्या क्षमतेच्या बॅटऱ्या आणि ४जी तसेच ५जी जोडणी यांचा समावेश केला आहे. उपयुक्त तंत्रज्ञान अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ही उत्पादने विकसित करण्यात आल्याचे कंपनीने म्हटले आहे.

Ai+ Smartphone चे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव सेठ म्हणाले, "सणासुदीचा काळ हा लाखो ग्राहकांसाठी तंत्रज्ञानाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्याचा काळ असतो. पहिला स्मार्टफोन, नवीन उपकरण, शिक्षणासाठी साधन किंवा काम आणि मनोरंजन एकत्र आणणारे उपकरण अशा विविध गरजा ग्राहकांच्या असतात. Pulse 2 FE, NovaTab आणि Nova LapTabच्या माध्यमातून या विविध गरजांसाठी परवडणाऱ्या पर्यायांसह उत्पादने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्मार्टफोनच्या पलीकडे जाऊन भारतात विकसित केलेली आणि जागतिक स्पर्धेची महत्त्वाकांक्षा असलेली जोडलेली तंत्रज्ञान परिसंस्था उभारण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे."

## भीमाशंकर मार्फत सभासद, ऊस उत्पादकांना गावोगावी साखर वाटप

भीमाशंकर : (स. गांवकरी)

पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे माजी सहकारमंत्री मा.ना. श्री. दिलीपराव वळसे पाटील यांचे मार्गदर्शनानुसार सभासद व ऊस उत्पादकांना प्रतिवर्षाप्रमाणे दिपावली निमित्त गाव व गटवार साखर वाटपाचे नियोजन केले आहे. त्यानुसार शुक्रवार दि. २ ऑक्टोबर ते शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत रु. २०/- प्रति किलो दराने गावोगावी साखर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

कारखान्यामार्फत मागील वर्षी सभासदांसाठी स्मार्ट साखर कार्ड विभागीय शेतकी कार्यालयामध्ये वाटप करणेत आलेली आहेत. तसेच हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादकांसाठी साखर कार्ड वाटपाचे काम संबंधित विभागीय शेतकी गट ऑफिसला चालू आहे. नियोजीत साखर वाटप तारखेला साखर घेताना सभासद व ऊस उत्पादकांनी त्यांना दिलेले स्मार्ट कार्ड व ओळखीचा पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे. साखरेचे वाटप कारखान्याचे भागधारक व गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरविलेला आहे यांचेसाठी साखर वाटप राहील.

त्यामध्ये (१) पूर्ण शेअर्स (रक्कम रु. १५,०००/-) व ऊस पुरवठा केलेले - ८० किलो (२) फक्त पूर्ण शेअर्स (रक्कम रु. १५,०००/-) - ५० किलो (३) अपूर्ण शेअर्स रक्कम व ऊस पुरवठा केलेले - ४० किलो (४) फक्त ऊस पुरवठा केलेले - ४० किलो (५) फक्त अपूर्ण शेअर्स रक्कम जमा केलेले - ३० किलो याप्रमाणे खालील तारखेनुसार विभागीय शेतकी गटांतर्गत गावोगावी १०, २० व ५० किलो पॅकींगमध्ये साखर वाटपाचे नियोजन केलेले आहे.

## 'श्री गणेशा आरोग्याचा' मोफत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात

जुन्नर : (स. गांवकरी)

मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय मदत कक्ष पुणे,डिसेंट फाउंडेशन (पुणे) आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अलदरे यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच कु.सोहम संतोष सरजिने यांच्या वाढ दिवसानिमित्त अलदरे ता:- जुन्नर येथील सरजिनेवाडी मधील हनुमान मंदिर येथे 'श्री गणेशा आरोग्याचा' या मोफत आरोग्य तपासणी, जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर अत्यंत यशस्वीरीत्या व उत्साहात संपन्न झाले. या शिबिरामध्ये ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध आरोग्य तपासण्या व मोफत उपचार उपलब्ध करून देण्यात आले होते.



शिबिरात झालेल्या मुख्य तपासण्या,उपचार,हृदयरोग व मूत्ररोग तपासणी व उपचार: श्री हॉस्पिटल:-आळेफाटा आस्था ब्रेस्ट कॅन्सर पूर्व तपासणी व जनजागृती:-डोके हॉस्पिटल, नारायणगाव नेत्र तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया:-माऊली आय केअर सेंटर, जुन्नर बी.पी. शुगर व रक्तातील विविध तपासण्या:-हिंद लॅब, जुन्नर तसेच, शिबिरामध्ये संशयित आढळलेल्या रुग्णांवर पुढील तपासण्या आणि महात्मा ज्योतिबा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार शस्त्रक्रियांची सोय करण्यात आली आहे.या शिबिराचा २३० नागरिकांनी लाभ घेतला तर १७६ जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर व वैद्यकीय तज्ज्ञ उपस्थित होते. डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, गणेश मेहेर श्री हॉस्पिटल, आळेफाटा येथील डॉ. सचिन शिंदे, डॉ.साकीना शेख कृष्णा रोकडे, विशाल पाटील, संचिता डुंबरे माऊली आय केअर सेंटर चे विलास बोन्द्रे, हिंद लॅब, जुन्नरचे मंगेश साळवे उज्वला गवळी, छाया पाटील (टेक्नेशियन, डिसेंट फाउंडेशन, पुणे) प्राथमिक आरोग्य उपकेंद्र पाडळी च्या आरोग्य सेविका प्रियांका मेंगाळ, अमोल गवारी, अंकुश दाते, ज्योती पांडे, आशा सेविका सीमा पपडे, तेजस्विनी सरजिने, विजया बटवाल, ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्तित होत्या या शिबिरास सरजिने वाडी व अलदरे परिसरातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वीतेसाठी संतोष सरजिने, विठ्ठल महाराज सरजिने, दीपक सरजिने व समस्त ग्रामस्थ मंडळी सरजिनेवाडी, अलदरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘माझा शेतकरी राजा अडचणीत असताना सेलिब्रेशन कशासाठी?’



## लग्नाच्या २० व्या वाढदिवसानिमित्त तृप्तीताई देसाई यांचे अनोखे आवाहन; शेतकऱ्यांना थेट मदत करण्याचे आवाहन

पुणे : (स. गांवकरी)

सामाजिक क्षेत्रात विविध प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडणाऱ्या भूमाता ब्रिगेड आणि भूमाता फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. तृप्तीताई प्रशांत देसाई यांच्या लग्नाला आज दिनांक 29 सप्टेंबर 2026 रोजी २० वर्षे पूर्ण होत आहेत. मात्र, या महत्त्वपूर्ण वैवाहिक टप्प्याचा जल्लोष करण्याऐवजी त्यांनी महाराष्ट्रातील शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या परिस्थितीची जाणीव ठेवत यंदाचा दिवस सामाजिक संवेदनशीलतेने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

‘माझा शेतकरी राजा अडचणीत असताना सेलिब्रेशन कशासाठी?’ असा सवाल करत तृप्तीताई देसाई यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक आणि शुभेच्छुकांना केक, बुके, भेटवस्तू तसेच अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. त्याऐवजी शुभेच्छांसाठी खर्च होणारी रक्कम एखाद्या गरजू शेतकरी कुटुंबाच्या मदतीसाठी वापरावी, अशी भावनिक भूमिका त्यांनी मांडली आहे.

दरवर्षी भूमाता ब्रिगेड आणि भूमाता फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते तृप्तीताई देसाई यांच्या वैवाहिक वाढदिवसानिमित्त त्यांची भेट घेतात. केक कापणे, पुष्पगुच्छ देणे, भेटवस्तू देणे तसेच सामाजिक माध्यमांवर शुभेच्छांचे संदेश आणि बॅनर प्रसिद्ध करणे, असा उपक्रम होत असतो. मात्र, यंदा शेतकरी बांधवांसमोरील संकटाचे गांभीर्य लक्षात घेऊन अशा प्रकारचे कोणतेही सेलिब्रेशन करू नये, अशी स्पष्ट सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केली आहे.

तृप्तीताई देसाई यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलेल्या संदेशात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी विविध संकटांना सामोरा जात असताना आपल्या वैयक्तिक आनंदासाठी मोठा खर्च करणे योग्य वाटत नाही. शेतकरी कुटुंबांच्या घरात अन्नधान्याची चिंता असताना आपण केक, बुके आणि महागड्या भेटवस्तूंवर पैसे खर्च करण्यापेक्षा गरजू कुटुंबाच्या मदतीसाठी हात पुढे करणे अधिक महत्त्वाचे आहे.

ज्या कार्यकर्त्यांना किंवा हितचिंतकांना मनापासून शुभेच्छा द्यायच्या आहेत, त्यांनी त्यासाठी स्वतंत्र खर्च करण्याऐवजी एखाद्या गरजू आणि अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला थेट आर्थिक मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून थेट मदत पोहोचवता येत असल्याने शुभेच्छांचा खर्च वाचवून तोच पैसा गरजू शेतकरी कुटुंबासाठी वापरण्याचा संदेश त्यांनी दिला आहे.

केवळ आवाहन करून न थांबता शेतकरी कुटुंबांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी तृप्तीताई देसाई लवकरच राज्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या दौऱ्यात शेतकरी कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या अडचणी, गरजा आणि परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. शेतकरी हा केवळ शेती करणारा घटक नसून संपूर्ण समाजाच्या अन्नव्यवस्थेचा आधार आहे. त्यामुळे संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे ही सामाजिक जबाबदारी आहे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली आहे.

लग्नाचा २० वा वाढदिवस हा प्रत्येक दाम्पत्यासाठी आनंदाचा आणि आठवणींचा दिवस असतो. अशा दिवशी मोठ्या प्रमाणात कार्यक्रम, भेटवस्तू आणि सेलिब्रेशन करण्याची परंपरा समाजात पाहायला मिळते. मात्र, तृप्तीताई देसाई यांनी वैयक्तिक आनंदापेक्षा समाजातील गरजू घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यांच्या या भूमिकेतून सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे करण्याचा संदेश मिळतो. आपल्या आनंदाच्या प्रसंगी समाजातील एखाद्या गरजू कुटुंबाला मदत केली, तर त्या आनंदाला अधिक व्यापक अर्थ प्राप्त होतो, ही भावना त्यांच्या आवाहनामागे असल्याचे दिसून येते.

“माझा शेतकरी राजा अडचणीत असताना आणि त्याच्या घरात खाण्याचे वांधे असताना आपण उत्सव साजरे करणे मला अजिबात मान्य नाही. मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यापेक्षा एका दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू आणणे हीच माझ्यासाठी खरी भेट ठरेल,” असे सौ. तृप्तीताई प्रशांत देसाई यांनी म्हटले आहे.

> "माझा शेतकरी राजा अडचणीत असताना आणि त्याच्या घरात खाण्याचे वांधे असताना आपण उत्सव साजरे करणे मला अजिबात मान्य नाही. मला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यापेक्षा एका दुष्काळग्रस्त शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू आणणे हीच माझ्यासाठी खरी भेट ठरेल."
>
> **- सौ. तृप्तीताई प्रशांत देसाई**
>
> **(संस्थापक अध्यक्षा - भूमाता ब्रिगेड, भूमाता फाउंडेशन)**

## थोडक्यात पण महत्वाचे



### साई मित्र परिवार व ग्रामस्थांनी केला स.पो.नि. मीरा देशमुख यांचा गौरव !

रावेर (स. गांवकरी) : तालुक्यातील निंभोरा येथील निंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील खिर्डी वडगांव, विवरा, निंभोरा सह परिसरातील गावांमध्ये अनेक ठिकाणी घरफोड्या तसेच पशुधन शेती साहित्य जनरेटर घरातील सोने-चांदी मोठ्या प्रमाणात चोरी केल्या होत्या या चोरी झालेल्या घटनेचा तपास फैजपूर पोलीस विभागीय अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली निंभोरा पोलीस ठाण्याच्या स.पो.नी. मीरा देशमुख व त्यांचे सहकारी पोलीस उपनिरीक्षक अभय ढाकणे, ममता तडवी सर्व पोलीस होमगार्ड यांनी हद्दीतील चोरी झालेला प्रकार उघडीस आणून चोरी करणाऱ्यांना अटक केली त्याबद्दल व गणपती उत्सव शांततेत व उत्साहात होण्यासाठी पोलीस प्रशासनाने अनमोल सहकार्य केल्याबद्दल निंभोरा येथील साई मित्र परिवारा व ग्रामस्थ तर्फे निंभोरा पोलीस ठाण्यात स.पो.नि मीरा देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अभय ढाकणे, ममता तडवी व पोलिसांचा सत्कार करून गौरव केला यावेळी अनिल बऱ्हाटे, मनोज सोनार,प्रमोद कोंडे,राजीव बोरसे, सुधाकर भंगाळे, महेंद्र कोळी, राहुल चौधरी, निखिल कोळी, अजय चिमणकारे, शेख मुजाहिद शेख गुलाब, युनुस खा शफी खान, काशिनाथ शेलोडे, प्रभाकर सोनवणे, मनोहर तायडे, शरीफ खान रुस्तम खान, आरिफ खान बाबू खान, रहीम खान, विजय सोनार, गजानन पाटील, यासह आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी यावेळी सपोनी मीरा देशमुख सपोणी मीरा देशमुख पोलीस उपनिरीक्षक अभय ढाकणे राजीव बोरसे मनोज सोनार मनोहर तायडे यांनी मनोगत व्यक्त केले.

### ‘तेरा तुझको अर्पण’ अंतर्गत वघई पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

डांग (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील वघई तालुका पंचायत कार्यालयात कार्यरत असलेले रजनीशभाई एस. पटेल, रा. चिकटिया, ता. वांसदा, जि. नवसारी यांचा Samsung Galaxy मोबाईल फोन १८ जून २०२६ रोजी नोकरीचे काम पूर्ण करून घरी जात असताना रस्त्यात कुठेतरी पडून हरवला होता. हरवलेला मोबाईल शोधून देण्याबाबत रजनीशभाई पटेल यांनी २४ जून २०२६ रोजी वघई पोलीस ठाण्यात अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या आधारे वघई पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी ए. ए. चावडा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने हरवलेल्या मोबाईलचा तांत्रिक तपास सुरू केला. वघई पोलिसांनी मोबाईलशी संबंधित तांत्रिक माहिती, उपलब्ध तांत्रिक स्रोत तसेच इतर माहितीचे विश्लेषण करून सखोल तपास केला. या तपासादरम्यान पोलिसांना हरवलेला Samsung Galaxy मोबाईल शोधून काढण्यात यश आले.मोबाईल सापडल्यानंतर आवश्यक ओळख पडताळणी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून वघई पोलिसांनी रजनीशभाई एस. पटेल यांना त्यांचा हरवलेला मोबाईल परत सुपूर्द केला. बराच काळ उलटल्यानंतर आपला हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने रजनीशभाई पटेल यांनी वघई पोलिसांच्या कार्याचे कौतुक करत पोलिसांचे आभार मानले.वघई पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला असून, ‘तेरा तुझको अर्पण’ उपक्रमांतर्गत पोलिसांनी नागरिकांच्या हरवलेल्या वस्तू शोधून परत देण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्याचे दिसून आले.



## वंदे मातरम् गणेश मंडळातर्फे कर्तृत्ववान वेलमा समाज बांधवांचा गौरव

किनवट : (स. गांवकरी)

किनवट शहरातील मानाचे आणि सामाजिक उपक्रमांसाठी परिचित असलेल्या वंदे मातरम् गणेश मंडळ २०२६ तर्फे वेलमा समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा सन्मान करण्यात आला. समाजातील युवकांनी शिक्षण, प्रशासन, बँकिंग आणि पोलिस सेवेसह विविध क्षेत्रांत मिळवलेल्या यशाची दखल घेत त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. यावेळी दिलीप मुत्तेपराव सिरमनवार यांची पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल, अमित माधवराव दासरवार यांची केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती झाल्याबद्दल, सौ. ऐश्वर्या रोहन पिसारीवार यांची जिल्हा परिषद शिक्षिका पदावर नियुक्ती झाल्याबद्दल तसेच अक्षय बाबू दडगेलवार यांची ॲक्सिस बँकेत ऑपरेशन्स हेड म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. या सत्कार सोहळ्याच्या माध्यमातून समाजातील गुणवंत आणि कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देण्याबरोबरच नव्या पिढीसमोर सकारात्मक आदर्श निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

यंदाच्या गणेशोत्सवात वंदे मातरम् गणेश मंडळाने साकारलेला देखावा नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. देखाव्यामधून सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. गणेशोत्सवाच्या काळात मंडळाने केलेल्या विविध उपक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

गणेशोत्सवाच्या सांगता सोहळ्यातील विसर्जन प्रक्रियेतही मंडळाने महत्त्वाची भूमिका बजावली. विसर्जन मिरवणूक आणि संबंधित व्यवस्थेमध्ये सहकार्य करत शांतता व शिस्त राखण्यास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी योगदान दिले. त्यामुळे गणेश विसर्जनाचा कार्यक्रम शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही - तांबे

जुन्नर : (स. गांवकरी)



ओतूर ता:- जुन्नरयेथील प्रथितयश शैक्षणिक संस्था असणाऱ्या ग्राम विकास मंडळ या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीचबिनविरोध झाली.यावेळी सभासदांचे आभार मानताना अनिल तांबे यांनी वरील उद्गार काढले.

याविषयी अधिक माहिती देताना संस्थेचे सचिव प्रदीप गाढवे म्हणाले की,"सन २०२६ ते २०३१ साठी पंचवार्षिक निवडणूक बिन विरोध झाली आहे.सर्व सभासदांनी एक मुखाने कार्यकारिणीची निवड केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे म्हणाले की,"सभासदांनी आमच्यावर व कार्यकारिणीवर जो विश्वास व्यक्त केला आहे त्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही.संस्थेच्या प्रगतीसाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध राहू."

संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, उपाध्यक्ष राजेंद्र डुंबरे, खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे,सहसचिव पंकज घोलप, संजय वल्हवण कर अमोल डुंबरे, रोहिदास घुले, सिताराम डुंबरे, शांताराम पानसरे, किशोर तांबे, प्रकाश डुंबरे, नितीन तांबे, गोविंद डुंबरे, गणीभाई मोमीन, अशोक अहिनवे, अजित कर्डिले यांची कार्यकारणी मंडळात बिन विरोध निवड झाली. यावेळी रामदास घुले, व्ही.एन.सुतार, डी.डी.ठिकेकर, विश्वास तांबे, चांद शेठ मोमीन, ॲड.गोरख पानसरे, सुरेश घुले, प्रशांत डुंबरे, शशिकांत तांबे, दीपक तांबे,शंकर हाडवळे, दिलीप तांबे, डी.व्ही. पानसरे, राजश्री भालेकर, प्रतीक अकोलकर, शरद माळवे, भगवंत घोडे, आदी सभासद उपस्थित होते.

श्री प्रशांत डुंबरे यांची पंचायत समितीच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल तसेच प्रमोद कुमार जाधव यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळाल्या बद्दल मान्यवरांच्या शुभ हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. माझी प्राचार्य सुरेश घुले,माजी मुख्याध्यापक विलास सुतार, अजित पानसरे, यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रदीप गाढवे यांनी केले.भाऊसाहेब खाडे यांनी सूत्रसंचालन तर प्रशांत डुंबरे यांनी आभार मानले.

## ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेसचे जोरदार निषेध आंदोलन

नांदेड : (स. गांवकरी)



भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत केलेल्या भ्रष्ट कारभार व वोट चोरी विरोधात दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात आणि उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयापुढे सोमवार (ता.२८) रोजी जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली.

निवडणूक आयोगाने निपक्षपाती काम करणे अपेक्षित असताना ज्ञानेश कुमार यांच्या निवडणूक आयोगाने भाजपा हिताचे काम केले आहे. याबाबत वेळोवेळी लोकसभा विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी पर्दाफाश केला आहे. हल्लीच एका राष्ट्रीय प्रसारमाध्यमाने निवडणूक आयोगातील मतभेद जगजाहीर करत वोटचोरीवर शिक्कामोर्तब केला आहे, यामुळे ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजिनामा द्यावा असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले. यावेळी माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, डॉ. यशपाल भिंगे, डॉ. श्रावण रँपनवाड, डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, अब्दुल सत्तार, आनंद चव्हाण, संजय बेळगे, संजय कऱ्हाळे, प्रा. आनंत राऊत, कुमार कुर्तडीकर, महेश देशमुख तरोडेकर, प्रा.मनुरकर, आनंद गुंडिले, नगराध्यक्ष रफिक भाई, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, राजू गोडबोले, मो. इब्राहिम, सचिन टाले, सुरेश हटकर, गोविंद बाबा गोंड, विनोद कांनचगिरे, तातेराव शिंदे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, अतुल पेदेवाड, गणेश ढगे, शंकर शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, ज्योती कदम, जेशिका शिंदे, नसिम पठाण, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, शेर अली, गगन यादव, प्रविण कानगुले, दिपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, अब्दुल रहिम, रमेश चित्ते, आनंद कल्याणकर, संदीप देशमुख, संजय वाघमारे, शिवहरी गाडे, निरंजन पावडे, नागराज सुलगेकर, राजू बोळसेकर, अभिलाष पावडे, व्यंकट मोरे, प्रताप देशमुख, जसपालसिंघ तबेलेवाले, आंबादास रातोळे, संदीप काळबांडे, महेश चव्हाण, विजय सोंडारे,पंजाब चव्हाण,अलिम खान, सय्यद रिहान, उत्कर्ष सोंडारे, गोविंद पाटील, अजहर शेख आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. पुंडलिक आमले यांच्या काँग्रेस तालुकाध्यक्ष पदाच्या दावेदारीला विरोधाची चर्चा

किनवट : (स. गांवकरी)

आदिवासी समाजातील एम.बी.बी.एस. डॉक्टर आणि युवा नेतृत्व म्हणून पुढे आलेले डॉ. पुंडलिक आमले यांनी काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदासाठी दावेदारी केल्याने किनवट काँग्रेसमधील अंतर्गत राजकीय समीकरणे चर्चेत आली आहेत. त्यांच्या दावेदारीला विद्यमान तालुकाध्यक्ष सूर्यकांत रेड्डी, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती आणि गिरीष नेम्मानिवार यांच्याकडून विरोध असल्याची चर्चा काँग्रेसच्या स्थानिक वर्तुळात आहे.



दरम्यान, हे पदाधिकारी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या समर्थक गटाशी संबंधित असल्याचे सांगितले जात असून, डॉ. आमले यांना तालुकाध्यक्षपदाची संधी मिळू नये यासाठी विरोध केला जात असल्याचा आरोप त्यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे.

गेल्या दहा वर्षांत काँग्रेसमध्ये नव्या नेतृत्वाला पुरेशी संधी मिळाली नाही आणि अनेक पदाधिकाऱ्यांना संघटनेत स्थिरावू दिले गेले नाही, त्यामुळे पक्षाची स्थानिक संघटनात्मक ताकद कमी झाली, अशी नाराजी काही काँग्रेस कार्यकर्ते व नागरिक व्यक्त करीत असल्याचे सांगितले जाते. मात्र, या आरोपांची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही.

डॉ. आमले हे आदिवासी समाजातील युवा चेहरा असून त्यांनी २०२४ ची विधानसभा निवडणूक लढवली आहे. विविध आंदोलन, मोर्चे आणि निवेदनांच्या माध्यमातून ते काँग्रेसच्या स्थानिक राजकारणात सक्रिय राहिले आहेत. त्यामुळे अनुभवी नेतृत्व कायम ठेवायचे की आदिवासी समाजातील युवा चेहऱ्याला तालुकाध्यक्षपदाची संधी द्यायची, याबाबत काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## ०३ ऑक्टोबरला नवी मुंबई वाशी येथे रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा होणार

बुलडाणा : (स. गांवकरी)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चा ६९ वा वर्धापन दिन दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई, वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे दुपारी २.०० वाजता मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार लोकनेते डॉ. रामदासजी आठवले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, लोकनेते माजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख उपस्थिती प्रदेश कार्यध्यक्ष बाबूरावजी कदम, प्रदेश सरचिटणीस गौतम दादा सोनोवने, राष्ट्रीय सचिव माजी मंत्री अविनास माहतेकर, राज्यसंघटक पँथर सुधाकरजी तायडे, विदर्भअध्यक्ष मोहनजी भोयर, विदर्भ सचिव दलित मित्र विजय सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भव्य मेळावा होणार आहे.




यावेळी बुलडाणा जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव, उत्तर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब सरदार, दक्षिण जिल्हाध्यक्ष भाई डॉ. भिमटागर दिलीप खरात, जिल्हाउपाध्यक्ष प्रा. दिलीप काकडे सर, जिल्हा संघटक संपर्क प्रमुख इंजिनियर शरददादा खरात, आशाताई वानखडे, मुरलीधर गवई, संजय वाकोडे, प्रा. मुक्तार पठाण सर, वंदनाताई वाघ, प्रकाश पाटील, केशव सरकटे, मेहकर फोजी राहूल आवसरमोल, राणा मोरे, चिखली हीम्मतराव जाधव, मोताळा भाई बाळासाहेब आहिरे, मलकापूर दिलीप इंगळे, लोणार समाधान सरदार, सिंदखेड राजा पत्रकार भानुदास शेजूळ,नांदुरा पत्रकार शैलेश वाकोडे, जळगाव जामोद संतोष वानखडे, जिल्हामहिलाध्यक्ष रोहीणीताई, निळकंठ दादा सोनुने, प्रदिप मुखदयाल, सुधीरदादा हिवाळे, आकाशभैया साळवे यांनी सर्व आंबेडकरी जनतेला आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.

ते म्हणाले, ०३ ऑक्टोबर हा रिपब्लिकन पक्षाचा ६९ वा वर्धापन दिन आहे. हा दिवस आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या या पक्षाचा विचार घरा-घरात पोहोचवण्यासाठी हा मेळावा अत्यंत महत्वाचा आहे. मी सर्व केंद्रीय कार्यकारणी, राज्य कार्यकारणी, जिल्हा, विभागीय, तालुका आणि शाखा पातळीवरील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आंबेडकरी प्रेमी जनतेला आवाहन करतो की आपण मोठ्या संख्येने वाशी येथे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी आणि पक्षाची ताकद दाखवावी."*

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी राज्यभरातून हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार असून, पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत महत्वाचे निर्णय घेण्यात येणार आहेत. तरी सर्व कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन बुलढाणा जिल्हाच्या सर्व पदाधिकारी व जिल्हा कार्यालयाकडून करण्यात आले आहे. विनंती वजा सुचना करण्यात येते की, जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी व तालुका प्रमुख तसेच सर्व सभासदांनी आपल्या स्तरावर जास्तीत जास्त जाहीरात करावी ही विनंती बाबासाहेब जाधव, भाऊसाहेब सरदार, भाई डॉ. दिलीप खरात यांनी सर्व जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून पक्षाची ताकद व एकजूट दाखवावी असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

# दिव्यांग व एकल महिला जनजागृती मेळावा संपन्न

**जुन्नर : (स. गांवकरी)**

तळेरान ग्रामपंचायत व प्रश्न फाउंडेशन, श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने तळेरान न्हानेची वाडी येथे ग्रामीण भागातील २१ प्रकारच्या दिव्यांग, एकल महिला मध्ये विधवा, निराधार सोडचिठ्ठी झालेल्या परित्यक्ता व ज्या महिलेचे वय ४० च्या पुढील ज्यांनी लग्न च केले नाही अश्या लोकांच्या नाव नोंदणी व शासनाच्या विविध योजनाची माहिती व दिव्यांग लोकांना आवश्यक साहित्य साधने वाटप पुर्व तपासणी श्री राधेश्याम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण व अरुण शेरकर अध्यक्ष यांच्यामार्गदर्शनाखाली करण्यात आली.

प्रश्न फाऊडेशन च्या माध्यमातून दिव्यांग युडिआय डी कार्ड ऑनलाईन रजिस्टर, महाआयडी कार्ड तसेच संजय गांधी, श्रावण बाळ पेन्शन अर्ज समाज कल्याण उदरनिर्वाह भत्ता चे फार्म भरुन घेतले या वेळी वाडयावस्ती वरिलअनेक जेष्ठ व दिव्यांग एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी अध्यक्षीय भाषणात सरपंच श्री गोविंद साबळे व राजश्री कोकाटे (उपसरपंच) यांनी जनजागृती कार्यक्रमाचे कौतुकास्पद




उल्लेख केला असून ग्रामीण भागातील अनेक लोक या योजना पासून वंचित असून लवकरच पुन्हा मोठ्या प्रमाणात जनजागृती करुन वंचित लोकांना लाभ मिळून देण्यासाठी पुन्हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल तेव्हा लागणारे मदत ग्रामपंचायत स्तरावर केली जाईल असे आश्वासन दिले या वेळी कार्यक्रमात १६७ लोकांनी नोंदणी केली व लाभ घेतला.

या वेळी प्रविण कोकाटे (मा. उपसरपंच) विलास डावखर (मा. ग्रा.सदस्य), राधेश्याम संस्था चे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण, अरुण शेरकर (अध्यक्ष), सौरभ मातेले (संचालक), तुकाराम साबळे, दिलीप शिन्दे, मारुती घोडे, दूंदा मेमाणे सुरेश गोडे, राजश्री कदम संचालिका सुमन काठे, निता मेमाणे, ऋतुजा साबळे, ग्रामपंचायत कर्मचारी, लिला बाई पारधी, अर्जुन कदम व दिव्यांग एकल महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी राधेश्याम संस्थेचे अध्यक्ष श्री अरुण शेरकर यांनी एकल महिला व दिव्यांग लोकांना आपली नाव नोंदणी संस्थेच्या कार्यालयात करुन विविध योजना चा लाभ घेण्यासाठी आवाहन केले.



आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदकविजेता ठाणेकर नेमबाज रुद्रांक्ष पाटीलचे ठाण्यात जल्लोषात स्वागत; त्याच्या यशाचा ठाणेकरांना अभिमान!

## थोडक्यात बातम्या...




### Mivi One 5G सह Miviची स्मार्टफोन बाजारपेठेत एंट्री

पुणे (स. गांवकरी) : भारतातील स्वदेशी ग्राहक तंत्रज्ञान ब्रँड Mivi ने 'Mivi One 5G' या स्मार्टफोनच्या माध्यमातून भारतीय स्मार्टफोन बाजारपेठेत प्रवेश केला आहे. दैनंदिन वापरासाठी दमदार कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि स्वच्छ अँड्रॉइड अनुभव देण्यावर या स्मार्टफोनमध्ये भर देण्यात आला आहे. ४ नॅनोमीटर तंत्रज्ञानावर आधारित स्नॅपड्रॅगन ४ जेन २ मोबाइल प्लॅटफॉर्म असलेल्या Mivi One 5G मध्ये ६,००० एमएएच क्षमतेची बॅटरी आणि ५० मेगापिक्सेलचा ड्युअल कॅमेरा देण्यात आला आहे. याशिवाय 'प्युअर अँड्रॉइड १६' अनुभव आणि 'Mivi Super Call' यांसारखी वैशिष्ट्येही देण्यात आली आहेत. 'Pretty Powerful' या संकल्पनेसह सादर करण्यात आलेला हा स्मार्टफोन स्ट्रीमिंग, छायाचित्रण, समाजमाध्यमांचा वापर, खेळ, एकाच वेळी अनेक कामे आणि दैनंदिन वापर लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. तरुण ग्राहकांना लक्षात घेऊन आकर्षक रचना आणि कार्यक्षम तंत्रज्ञानाचा मेळ साधण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे.

### वाढदिवसाचा खर्च टाळून दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचा हात

ठाणे (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत भाजपा नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी यंदाचा वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी सामाजिक कार्यासाठी देण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांना केले होते. मुख्यमंत्री सहायता निधी हा महाराष्ट्र शासनाचा अधिकृत निधी असून आपत्कालीन गरजूंना मदत करण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. दुष्काळग्रस्त नागरिकांना मदत मिळावी आणि संकटाच्या काळात कष्टकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहता यावे, या उद्देशाने सौ. वेदिका साहिल पाटील यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ लाख ११ हजार रुपयांचा धनादेश भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केला. वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून सामाजिक कार्याला प्राधान्य देण्याचा हा उपक्रम असल्याचे वेदिका साहिल पाटील यांनी सांगितले. दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी केलेला हा छोटासा सामाजिक प्रयत्न असून, समाजातील इतरांनीही गरजूंच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, आमदार माधवी नाईक, आमदार संजय कुटे, भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, नंदकिशोर परब, ठाणे महापालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील, कल्याण-डोंबिवली महापालिकेचे उपमहापौर राहुल दामले, ठाणे महापालिकेचे गटनेते मुकेश मोकाशी, कल्याण-डोंबिवली महापालिकेचे गटनेते शशिकांत कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

### दिवा उड्डाणपुलासाठी बाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला द्या

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, दिवा रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रस्तावित उड्डाणपुलाचे काम भूसंपादनाच्या प्रश्नामुळे गेल्या सहा-सात वर्षांपासून रखडले आहे. दिवा विभागातील जमिनींचे रेडी रेकनर दर तुलनेने कमी असल्याने महापालिकेकडून देण्यात येणारा मोबदला शेतकरी व जमीनमालकांच्या अपेक्षेच्या तुलनेत अत्यल्प ठरत आहे. त्यामुळे बाधित जमीनमालक मोबदला स्वीकारण्यास तयार नसल्याने भूसंपादन प्रक्रिया प्रलंबित आहे. नुकताच मौजे मोघरपाडा येथील मेट्रो एकात्मिक कारशेडसाठी बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसन व



मोबदल्याबाबत राज्य मंत्रिमंडळाने विशेष निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार पात्र प्रकल्पबाधित जमीनमालकांना २२.५ टक्के विकसित भूखंड, तर पात्र अतिक्रमणधारक/भोगवटादारांना १२.५ टक्के विकसित भूखंड देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर दिवा उड्डाणपुलासाठी बाधित होणाऱ्या शेतकरी व जमीनमालकांना विशेष बाब म्हणून वाढीव व न्याय्य मोबदला अथवा विकसित भूखंड देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी नगरसेवक अॅड. आदेश भगत यांनी केली आहे.

# कुंभारी येथील निलेश आडगळे व त्याच्या चार साथीदाराने मिळून पारधी समाजातील दऱ्याप्पा काळे यांचा सोमवारी सकाळी केला निर्घृण खुन

**सोलापूर : (स. गांवकरी)**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे आदिवासी पारधी समाजाचा कार्यकर्ता दऱ्याप्पा काळे याचा गावातील गाव गुंड निलेश आडगळे व त्याच्या इतर चार साथीदाराने मिळून कुऱ्हाडीने वार करून निर्घृण खून केलेला आहे. ही घटना आज सोमवार दिनांक 28 सप्टेंबर 20 26 रोजी सकाळी कुंभारी जवळ असलेल्या जय नारायण गुरुकुल शाळेच्या रस्त्यावर घडली आहे.

वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंदे आणि अवैध व्यवसाया मुळे वळसंग परिक्षेत्रातील कायदा आणि सुव्यवस्था वारंवार बिघडत चालली आहे. पैशाच्या वादातून 54 वर्षीय दऱ्याप्पा काळे या सामाजिक कार्यकर्ते असलेल्या पारधी समाजातील व्यक्तीचा खून करण्यात आल्यामुळे पारधी समाजातील जनतेतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

वळसंग चे सद्दाम अमलीचुंगे यांच्या खुनाचे प्रकरण ताजे असतानाच दिवसा ढवळ्या व्यक्तीचा पैशाच्या व्यवहारा मधून निलेश आडगळे यांनी सोमवारी खून केला आहे.

तीन महिन्यात तीन खून वळसंग हद्दीत झाले आहेत. कुंभारी दोड्डी रस्त्यावर महिलेचा खून करण्यात आला होता. यानंतर वळसंग येथे सद्दाम अमलीचुंगे याचा खून करण्यात आला होता . आता कुंभारी भागातील पारधी समाजाचे नेते आणि सामाजिक कार्यकर्ते असलेल्या दऱ्याप्पा काळे या 54वर्षीय व्यक्तीचा पैशाच्या व्यवहारा मधून खून करण्यात आला आहे म्हणजेच वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा आणि सुव्यवस्था याचा पूर्णपणे बोजवारा



उडाला असून वळसंग पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध धंदे आणि अवैध व्यवसाय वाढले आहेत.

सोलापुरातील कुंभारी परिसरात पैशांच्या देवाणघेवाणीवरून झालेल्या वादामधून दऱ्याप्पा काळे आणि त्याच्या मुलीस घरी बोलावून घेऊन, कुऱ्हाड, बॅट आणि खोऱ्याने हल्ला करण्यात आला. या भीषण हल्ल्यात दोघेही बाप लेक गंभीर जखमी झाले होते. तर दऱ्याप्पा काळे यांचा जागीच मृत्यू झाला होता.

या प्रकरणात पाच जणांवर हल्ल्याचा आरोप असून, सिव्हिल पोलीस चौकीत याबाबत नोंद करण्यात आल्याची माहिती आहे.

वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार कायदा व सुव्यवस्था बिघडत चालली आहे असे या भागातील लोकांचे म्हणणे आहे वळसंग हद्दीत तीन महिन्यात आता पर्यंत तीन खून झाले आहेत महिन्याला एक खून होत आहे. कुंभारी दोड्डी रस्त्यावर महिलेचा खून करण्यात आला होता पुढे या महिलेच्या खुनाचे काय झाले हे गुलदस्त्यातच राहिले आहे कुंभारी दोड्डी वळसंग आचेगाव तसेच हणमगाव धोत्री रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवैध धंदे आणि अवैध व्यवसाय सुरू असल्याचे बोलले जात आहे तर रामपूर येथे मोठ्या प्रमाणात बोगस शिंदी विक्री केली जात असल्याचे कळते.

# मुलींनी डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे स्वप्न पाहावे - शेठ नानजीभाई ठक्कर

**आनंद, गुजरात : (स. गांवकरी)**

श्री रामदेवपीर सेवा मंडळाच्या वतीने वल्लभ विद्यालय, विद्यानगर, ता. आनंद, जि. आनंद येथील श्री बाबा रामदेवपीर महाराज मंदिरात २० सप्टेंबर २०२६ रोजी नेजा ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यानिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास नानजीभाई खीमजीभाई ठक्कर, नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, भोजाभाई राठोड, अरविंदभाई राठोड, अहमदाबाद येथील अर्जुनकाका गोहेल, गोविंदभाई, संजयभाई, डॉ. पार्वतीबेन राठोड, उर्वशीबेन राठोड यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर, पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थी व युवकांचा गौरव करण्यात आला. तसेच N.K.T. ट्रस्टच्या वतीने महिलांना साड्या, तर मुलांना व विद्यार्थ्यांना नोटबुक, पेन व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीवर विशेष भर देण्यात आला. शेठ नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "समाज सुखी, समृद्ध आणि सक्षम बनवायचा असेल तर शिक्षणाला सर्वोच्च महत्त्व दिले पाहिजे. समाजातील मुलींना उत्तम शिक्षण मिळण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. दलित समाजातील एखादी मुलगी डॉक्टर झाली, तर तिची ओळख केवळ दलित समाजाची मुलगी म्हणून न राहता एक यशस्वी 'डॉक्टर' म्हणून निर्माण होते. शिक्षण आणि यश व्यक्तीच्या ओळखीला अधिक उंचीवर घेऊन जाते."

# पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी नांदेड प्रशासन सज्ज

**नांदेड : (स. गांवकरी)**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या 5-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा प्रशासनाने निवडणूक तयारीला वेग दिला आहे. निवडणुकीचे कामकाज वेळेत व सुरळीत पार पाडण्यासाठी विविध कक्ष स्थापन करून जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली 5-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेमण्यात आलेल्या समितीचे नोडल अधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांची आढावा बैठक घेऊन सूचना देण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, सर्व उपविभागीय अधिकारी, नोडल अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी उपस्थित होते.

निवडणुकीसाठी नामनिर्देशन व मतदार यादी, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, प्रशिक्षण, मतपत्रिका तपासणी व वितरण, स्वीप व मतदार सुविधा, वाहन व वाहतूक व्यवस्था, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, टपाली मतपत्रिका, आयटी व पोल डे रिपोर्टिंग, स्ट्राँग रूम व मतमोजणी, अवैध दारू वाहतूक प्रतिबंध, निवडणूक खर्च देखरेख, माध्यम नियंत्रण तसेच मतदार मदत व तक्रार निवारण अशा विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

निवडणूक खर्चावर देखरेख ठेवून उमेदवार व राजकीय पक्षांच्या खर्चाची नोंद घेणे, माध्यमांमधील निवडणूकविषयक बातम्यांचे संनियंत्रण करणे आणि मतदारांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याची जबाबदारीही संबंधित कक्षांकडे सोपविण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी, असे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# मराठवाड्यातील दुष्काळ आणि शेतकऱ्यांची स्थिती : आकडेवारीतून समोर येणारे वास्तव-शुभम सचिन काळे

**अर्धापूर : (स. गांवकरी)**

राज्य सरकारने 25 सप्टेंबर रोजी राज्यातील 265 तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला, जो राज्याच्या जवळपास पाऊण भागाला व्यापतो. जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात सरासरी 18 टक्के पावसाची तूट नोंदवली गेली, तर सोलापूर जिल्ह्यात 57 टक्के, बीड जिल्ह्यात 49 टक्के आणि हिंगोली जिल्ह्यात 48 टक्के इतकी तूट नोंदवली गेली. पर्जन्यमानाचा एकत्रित आकडा जरी सरासरीजवळ वाटत असला तरी, पावसाच्या दोन फेऱ्यांमधील मोठा खंड हाच पिकांसाठी सर्वाधिक हानिकारक ठरला असल्याचे कृषी तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. नांदेड जिल्ह्यातील 14 तालुक्यांचा या यादीत समावेश असून, 45 दिवसांच्या कोरड्या पर्वानंतर जिल्ह्यात किमान 25 टक्के पीक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे.

लातूर व धाराशिव जिल्ह्यांना सरासरीच्या निम्माच पाऊस मिळाला, तर सोलापूर जिल्ह्यात पावसाची तूट 56 टक्क्यांवर पोहोचली. या भागांत पीक नुकसानीचा अंदाज 60 टक्क्यांहून अधिक असून, सोयाबीनचे नुकसान 80 ते 90 टक्के, कडधान्यांचे नुकसान याच प्रमाणात आणि तृणधान्यांचे नुकसान 60 ते 70 टक्के असल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीतून समोर येते. नांदेड जिल्ह्यात पावसाची तूट तुलनेने कमी, म्हणजे 23 टक्के असली तरी सोयाबीन व कापूस पिकांवर कीड व रोगांचा मोठा प्रादुर्भाव झाल्याने नुकसान वाढले आहे.

या संकटाचे सामाजिक परिणामही तितकेच गंभीर आहेत. नांदेड जिल्ह्यात जून ते ऑगस्ट 2026 या तीन महिन्यांत 35 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (NCRB) आकडेवारीनुसार 2024 मध्ये देशभरातील शेतकरी व शेतमजूर आत्महत्यांपैकी 36 टक्के आत्महत्या एकट्या महाराष्ट्रात झाल्या, हे प्रमाण देशात सर्वाधिक आहे. मराठवाड्यात 2023 मध्ये दहा महिन्यांतच 899 शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली होती.

राज्य सरकारने दुष्काळग्रस्त भागांसाठी 12 कलमी मदत योजना



जाहीर केली आहे, ज्यात जमीन महसूल माफी, कृषी कर्जाची पुनर्रचना, कर्ज वसुलीला स्थगिती, साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांच्या वीजबिलात सवलत, परीक्षा शुल्क माफी, रोजगार हमी योजनेच्या निकषांत शिथिलता आणि पिण्याच्या पाण्यासाठी टँकर व्यवस्था यांचा समावेश आहे. प्रत्यक्ष नुकसानभरपाईची रक्कम मात्र पंचनामे पूर्ण झाल्यानंतरच जाहीर होणार आहे.

DPLI च्या संशोधन चौकटीनुसार या संकटामागे केवळ यंदाच्या पावसाची तूट हे एकमेव कारण नाही. मराठवाड्यातील भूजल पातळी गेल्या तीस वर्षांत मोठ्या प्रमाणात खालावली असून, सिंचन प्रकल्प असूनही पाणी शेतांपर्यंत पोहोचण्यात अनेक मर्यादा आहेत, त्यामुळे प्रत्येक कमी पावसाचे वर्ष टोकाच्या संकटात रूपांतरित होते. त्याचबरोबर पीकविमा दाव्यांची पडताळणी व वितरण प्रक्रिया संथ असल्याने, प्रत्यक्ष नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांपर्यंत भरपाई वेळेत पोहोचत नसल्याचे आढळून येते. पंचनामे, विमा पडताळणी आणि प्रत्यक्ष भरपाई या तीन टप्प्यांतील विलंब हाच शेतकऱ्यांच्या असंतोषाचा प्रमुख मुद्दा ठरत आहे.

यावर उपाय म्हणून DPLI असे सुचवते की पंचनाम्यांची प्रक्रिया अधिक जलद व पारदर्शक करावी, पीकविमा दाव्यांच्या पडताळणीसाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी आणि मराठवाड्यातील भूजल व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन नियोजन आखावे. तात्पुरत्या मदतीसोबतच जलसंधारण व सिंचन क्षमता वाढवणाऱ्या उपाययोजनांवर सातत्याने भर दिल्यासच या भागातील शेतीचे संकट कायमस्वरूपी कमी होऊ शकेल.

# निरंतर समाजसेवेतील योगदानाबद्दल डॉ. विठ्ठल जाधव यांचा गौरव!

**नवी दिल्ली : (स. गांवकरी)**

भारतीय पोलीस सेवेत दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावत आपल्या प्रशासकीय कार्याचे मानवसेवेत रूपांतर करणारे सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव (IPS) यांचा मराठा समन्वय परिषदेतर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. विठ्ठल जाधव तसेच त्यांच्या अर्धांगिनी शिवमती विद्याताई जाधव यांना शाल, शिवधर्म गाथा, ऐतिहासिक संग्रह 'शिवभारत दिनदर्शिका २०२६' आणि 'स्वराज्य जनक परिवार प्रतिमा' भेट देऊन गौरविण्यात आले. शासकीय सेवेत कार्यरत असतानाही डॉ. जाधव यांनी अध्ययनाची आवड जोपासत पीएच.डी., एमबीए, एम.टेक., एलएलबी यांसह विविध शैक्षणिक पदव्या संपादन केल्या. सन १९८४ मध्ये महाराष्ट्र पोलीस सेवा संवर्गाच्या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले होते.

डॉ. जाधव यांनी भारतीय पोलीस सेवेत जवळपास तीन दशके विविध महत्त्वपूर्ण पदांवर कार्य केले. पोलीस प्रशासन, गुन्हे अन्वेषण, वाहतूक, सुरक्षा आणि गुप्तचर विभागासह विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पोलीस पदक (२००१)



यासह विविध पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले असून, भारत सरकारची ICAR Fellowship देखील त्यांना मिळाली आहे. पोलीस दलाच्या दैनंदिन कामकाजासाठी पूरक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे आणि पोलिसांच्या नियमित जबाबदाऱ्यांना सहाय्य मिळावे, या उद्देशाने महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या निर्मितीत डॉ. जाधव यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

सेवानिवृत्तीनंतरही डॉ. जाधव समाजसेवेत सक्रिय असून शांतिदूत परिवाराचे मुख्य सल्लागार म्हणून विविध सामाजिक उपक्रमांना मार्गदर्शन करीत आहेत. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिरे, विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच शेतकरी व पशुपालकांना उत्पन्ननिर्मितीसाठी मार्गदर्शन असे विविध उपक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले जात आहेत. कारागृहातील बंदिवानांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज लिखित ज्ञानेश्वरीच्या पारायणाच्या माध्यमातून मानवी मूल्ये, आत्मचिंतन आणि मानसिक शांततेचा संदेश देण्याचे कार्यही ते करीत आहेत. या सामाजिक कार्यात त्यांच्या अर्धांगिनी शिवमती विद्याताई जाधव यांचे सक्रिय सहकार्य लाभत असून त्या शांतिदूत परिवाराच्या अध्यक्षा आहेत. त्यांची कन्या डॉ. योगेश्वरी जाधव कराळे यांचेही संस्थेच्या उपक्रमांच्या समन्वय व तांत्रिक अंमलबजावणीत योगदान आहे. डॉ. विठ्ठल जाधव यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक सेवाकार्याची आणि सेवानिवृत्तीनंतरही सुरू असलेल्या समाजहिताच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. यावेळी मराठा समन्वय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री कमलेश पाटील आणि सचिव अॅड. शुभम गवांदे उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २८४ । किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क +91-8286562340 / 9004511593 8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

मंगळवार दि. २९ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेला गती देणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'ॲक्शन प्लॅन'!

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्याच्या आर्थिक व्यवस्थेत आवश्यक बदल घडवून आणण्यासाठी सहा महिन्यांत सुधारणा आणि कृतीचा आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीला दिले. राज्यातील निधी उभारणी, लेखांकन आणि उपलब्ध संसाधनांचे कार्यक्षम विनियोजन या तीन आघाड्यांवर अधिक वेगाने काम करण्याची गरज असून, समितीच्या शिफारशींची शासनाकडून गांभीर्याने अंमलबजावणी केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या कर आणि करेतर महसुलात वाढ करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीची बैठक बुधवारी सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत राज्याच्या आर्थिक व्यवस्थेतील विविध पद्धती आणि प्रणालींचा आढावा घेऊन त्यात आवश्यक बदल करण्याबाबत चर्चा झाली.

पारंपरिक महसूल संकलनाच्या पद्धतींपलीकडे जाऊन राज्याच्या विकास आराखड्याला वित्तपुरवठा करण्यासाठी साधनसंपत्ती उभारण्याचे नवे मार्ग शोधण्याची गरज असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील विविध यंत्रणांकडे सुमारे सहा ते सात हजार कोटी रुपयांचा निधी चार टक्के व्याजदराने गुंतविला जातो, तर दुसरीकडे राज्य शासनाला बाजारातून आठ ते नऊ टक्के व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. निधी उपलब्ध असतानाही अधिक व्याजदराने कर्ज उभारण्याची ही विसंगती दूर करण्यासाठी योग्य आर्थिक यंत्रणा उभारण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपलब्ध निधीचा अधिक परिणामकारक वापर करताना संबंधित यंत्रणांचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित राहणे आणि त्यांच्या निधीला सुरक्षितताही मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी अभिनव आर्थिक साधने आणि व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने समितीने उपाय सुचवावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीस वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, समितीचे अध्यक्ष विजय केळकर, सदस्य कार्थिक मुरलीधरन, रवी शंकर, माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महसूल व वने विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचन्द्र रस्तोगी, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे आदी उपस्थित होते.

खर्च व्यवस्थापनावरही भर

राज्याच्या खर्च व्यवस्थापनात अधिक कार्यक्षमता आणण्याची गरजही फडणवीस यांनी व्यक्त केली. विविध विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक असते. मात्र, निधी नियोजनातील त्रुटींमुळे गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवर अपेक्षित गुणक परिणाम साधला जात नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे राज्याच्या संपूर्ण आर्थिक कारभाराचे



नव्याने परीक्षण करून खर्चाची परिणामकारकता वाढविण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. तज्ज्ञ समितीची स्थापना औपचारिकता म्हणून करण्यात आलेली नाही. समितीच्या शिफारशींच्या आधारे शासनाच्या विद्यमान कार्यपद्धती आणि आर्थिक प्रणालींमध्ये आवश्यक बदल केले जातील, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची केंद्राने घेतली गंभीर दखल

## केंद्रीय पथक महाराष्ट्रात पाहणी करणार; कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दौरा करणार

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील सुमारे दोन–तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यातील परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत.

नवी दिल्लीतील पुसा येथील भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृहात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलन–रब्बी अभियान २०२६ च्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर व भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह केंद्र व विविध राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुमारे दोन–तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात असल्याचे नमूद करत चौहान यांनी केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीबाबत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचे केंद्रीय पथक प्रत्यक्ष पाहणी करून आकलन करणार आहे. कर्नाटकात ३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय पथक दाखल होणार असून, त्यानंतर महाराष्ट्रातही पथक पाठविण्यात येणार आहे. आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या राज्यांचा दौरा करणार असल्याचे चौहान यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन उपलब्ध पाण्याच्या ताळेबंदावर आधारित असावे, असे चौहान यांनी स्पष्ट केले. प्रत्येक राज्य आणि जिल्ह्याने सिंचनासाठी उपलब्ध पाणी तसेच जमिनीतील ओलावा यांचे मूल्यमापन करून त्यानुसार पिकांची निवड करावी.

# मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते खादी ग्रामोद्योग उत्पादन प्रदर्शनाचे उद्घाटन

मुंबई (समर्थ गांवकरी)

- **महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्रिमूर्ती प्रांगणात प्रदर्शन**
- **मंत्रालयात १ ऑक्टोबरपर्यंत खादी व ग्रामोद्योग उत्पादनांच्या खरेदीची संधी**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या वतीने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात खादी व ग्रामोद्योग उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन आणि उद्योग विकास आयुक्त कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रदर्शनातील एका स्टॉलचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्योग विभागाचे सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार डांगर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# अपुऱ्या पावसामुळे सोमठाणा तलावातील मत्स्यउत्पादनात मोठी घट

## मंत्री नितेश राणे यांनी दिले पंचनाम्याचे आदेश

जालना (समर्थ गांवकरी)

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील सोमठाणा तलावाची मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी तलाव परिसराची पाहणी करून मच्छीमार बांधवांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या पाहणी दौऱ्यात जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे आणि बदनापूरचे आमदार नारायण कुचे हे देखील उपस्थित होते.

मत्स्यउत्पादनात मोठी घसरण

यावर्षी अपुऱ्या पावसामुळे सोमठाणा तलावातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणावर घटली आहे. याचा थेट आणि गंभीर परिणाम मत्स्यउत्पादनावर झाला असून, गेल्यावर्षीच्या ७९% मत्स्यउत्पादनाच्या



तुलनेत यंदा ते केवळ २०% पर्यंत खाली आले आहे. यामुळे येथील मच्छीमार बांधवांचे आर्थिक नुकसान झाले आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत मंत्री नितेश राणे यांनी प्रशासनाला तातडीने निर्देश दिले, तलावातील गाळ काढण्याचे काम लवकरात लवकर हाती घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. नुकसानग्रस्त मच्छीमारांचे पंचनामे करून, शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांना शासनाकडून योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

# हिवरापहाडीच्या चिमुकल्यांच्या 'बॉटल माईक' रिपोर्टिंगची उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून दखल

मुंबई (समर्थ गांवकरी)

बीड जिल्ह्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिवरापहाडी (केंद्र जरूड) ता. बीड येथील चिमकल्या विद्यार्थिनींच्या 'बॉटल माईक' सोशल मीडिया रिपोर्टिंगची अखेर उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने दखल घेतली आहे. आम्हाला अधिकारी व्हायचंय, तुम्ही फक्त शिक्षक द्या अशी हाक मारणाऱ्या या मुलींना त्यांनी तातडीने प्रतिसाद दिला.

उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय आणि शिक्षण विभाग तात्काळ ॲक्शन मोडमध्ये आला. वरिष्ठांच्या आदेशानुसार शिक्षक शिवाजी जोगदंड यांची हिवरापहाडी शाळेत नियुक्ती करण्यात आली.

विद्यार्थिनींच्या आंदोलनाची दखल

हिवरापहाडी येथील दुर्गम भागातील शाळेत गेल्या काही दिवसांपासून गणित, विज्ञान आणि संगणक यांसारख्या महत्त्वाच्या विषयांसाठी शिक्षक उपलब्ध नव्हते. यावर तोडगा काढण्यासाठी येथील चिमुकल्या मुलींनी पाणी पिण्याच्या प्लास्टिक बॉटलचा माईक बनवून थेट वर्गातूनच अभिरुप बातमीपत्र सादर केले होते. हा भावनिक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हिडिओची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



यांनी बीड जिल्हा प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

प्रशासनाकडून शिक्षक रुजू

वरिष्ठ स्तरावरून थेट आदेश झाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने तात्काळ पावले उचलत शिक्षक शिवाजी जोगदंड यांची हिवरापहाडी शाळेत नियुक्ती करण्याचा आदेश जारी करण्यात आला असून त्या आदेशानुसार ते हिवरापहाडी शाळेत रुजू झाले आहेत.

# नाशिक जिल्हा काँग्रेसचा एल्गार; मुख्य निवडणूक आयुक्तांना अटक करण्याची मागणी

कनाशी (समर्थ गांवकरी)

SIR च्या माध्यमातून मत चोरी केली जात असल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना सेवेतून बडतर्फ करून अटक करण्याच्या मागणीसाठी नाशिक शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

काँग्रेस भवन, महात्मा गांधी मार्ग येथून हे आंदोलन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष रमेश कहांडोळे निलेश (बच्चू) अर्जुन खैरे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. भारताची लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून निवडणूक आयोगाने स्वायत्तता गमावली असल्याचा घणाघाती आरोप या पत्रात करण्यात आला आहे.

सत्ताधारी पक्षाच्या हातातील बाहुले बनल्याचा आरोप करत, निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या भारतीय जनता पक्षासाठी निवडणूक जिंकून देत असल्याचे म्हटले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे एकतर्फी निर्णय घेत असून माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस.वाय.कुरेशी यांनीही यावर आक्षेप घेतला आहे. गेल्या १० महिन्यात १४ वेळा ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयावर आक्षेप नोंदवला गेला आहे.

राहुल गांधी यांनी याबाबत पुराव्यासह पोलखोल केली असून बिहारमध्ये लाखो मते वगळणे, महाराष्ट्र विधानसभेत ९२ लाख मतदारांची नावे वाढवणे यातून भाजपला अनुचित लाभ मिळवून दिला जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या बातमीने यावर शिक्कामोर्तब केले आहे.

या आंदोलनात कळवण तालुका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष के. के.गांगुर्डे आणि आदिवासी सेलचे जिल्हाध्यक्ष राम चौरे यांनी सक्रिय सहभाग घेत आंदोलनाला बळ दिले. लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी ही लढाई असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




बिहारमध्ये लाखो आदिवासी, दलितांची मते वगळणे आणि महाराष्ट्रात ९२ लाख बोगस मते वाढवणे, हा आदिवासी समाजाच्या मताच्या अधिकारावर घाला आहे. ज्ञानेश कुमार हे सत्ताधाऱ्यांचे बाहुले बनले आहेत. या मत चोरीचा आम्ही कळवणच्या आदिवासी पट्ट्यातून तीव्र निषेध करतो आणि या लढाईत शेवटपर्यंत रस्त्यावर उतरू.

**– राम चौरे, जिल्हाध्यक्ष, आदिवासी सेल, नाशिक**

SIR च्या नावाखाली हा सरळ–सरळ मत चोरीचा प्रकार आहे. निवडणूक आयोगाने स्वायत्तता गमावून भाजपच्या दावणीला बांधून घेतले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना तात्काळ बडतर्फ करून अटक झालीच पाहिजे. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी कळवण काँग्रेस राहुल गांधींच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, हा आमचा निषेध नव्हे तर एल्गार आहे.

**– के.के. गांगुर्डे, तालुकाध्यक्ष, कळवण काँग्रेस**

## संक्षिप्त

### मध्य रेल्वेवर १ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान सखोल तिकीट तपासणी मोहीम

मुंबई (समर्थ गांवकरी)

मध्य रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. रेल्वे प्रवाशांच्या तिकिटांची सत्यता आणि वैधता तपासण्यासाठी मध्य रेल्वेवर दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत एक विशेष आणि सखोल तिकीट तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेदरम्यान स्थानकांवर तसेच रेल्वे प्रवासादरम्यान तिकिटांची कडक तपासणी केली जाईल.

### एकल माता कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र धोरणाचा मार्ग मोकळा

मुंबई (समर्थ गांवकरी)

एकल माता पालक कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना भेडसावणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य, विविध सुविधा आणि संरक्षण देण्याच्या उद्देशाने प्रस्तावित 'शैक्षणिक सहाय्य, संरक्षण आणि सक्षमीकरण धोरण–२०२६'साठी गठित करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. या अहवालाच्या आधारे धोरणाच्या पुढील कार्यवाहीला दिशा मिळणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली.

### 'लालपरी' आता होणार 'ई–लालपरी'

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात आता मोठा बदल होणार आहे. सन २०३७ पर्यंत एसटीचा १००% ताफा इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पारंपरिक डिझेल बसेसचे प्रमाण टप्प्याटप्प्याने कमी होऊन भविष्यात महाराष्ट्राची 'लालपरी' 'ई–लालपरी' म्हणून धावणार आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. एसटीच्या मुख्यालयात झालेल्या महामंडळाच्या ३१२ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या योजनेबाबत चर्चा करण्यात आली.

### कल्याण डोंबिवलीकरांवर पाणी संकट!

कल्याण (समर्थ गांवकरी)

कल्याण– डोंबिवलीकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. कल्याण– डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये उद्या अर्थात २९ सप्टेंबर रोजी पाणी कपात केली जाणार आहे. महानगर पालिका क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या बारावे, मोहिली, नेतिवली आणि टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रातील उपकरणांची देखभाल दुरूस्ती करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण केडीएमसी क्षेत्रामध्ये १२ तासांसाठी पाणीकपात केली जाणार आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये केडीएमसीकरांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावी लागण्याची शक्यता आहे. कोणकोणत्या क्षेत्रामध्ये पाणीकपातीचा प्रश्न भेडसावू शकतो, जाणून घेऊया... कल्याण– डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, नेतिबली आणि टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रातील विद्युत आणि यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. देखभाल दुरुस्तीची कामे करण्याकरिता मंगळवार २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १२ तासांकरिता महानगरपालिकेच्या बाराने, मोहिली, नेतिवली व टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रामधून कल्याण (पूर्व– पश्चिम), कल्याण ग्रामीण विभाग (मांडा–टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे) आणि डोंबिवली (पूर्व– पश्चिम) परिसरात होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी, परिसरातील नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करून आणि पुरेसा साठा करून महानगरपालिकेला सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे.

**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर**
महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर.
कार्यालय फोन नंबर - २३२६९१४ **Email id :-ahmednagarfederation@gmail.com**

**जा.क्र.पतसंस्था/फेडरेशन११९४/२०२६** **दिनांक :३०/०९/२०२६**

**स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस**
**नमुना 'झेड '**
**(नियम १०७पोट-नियम (११(ड-१)पहा.)**

ज्याअर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी **:- विवेकांनंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, जामखेड,ता.जामखेड.जि.अ.नगर** व्दारा: **अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या,अ.नगर** ,महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे .खाली सही करणा-याने जप्तीची नोटीस दिली असुन ,पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ,ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे.आणि सर्व नागरिकांना ,खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला /तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ,१९६१मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दि.२९/०९/२०२६**दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की ,मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये.आणि व्यवहार केल्यास **:- विवेकांनंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, जामखेड,ता.जामखेड.जि.अ.नगर** यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.न | थकबाकीदारांचे नाव | थकबाकी रक्कम | नोटिस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे आर चौ मी | पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार -दत्तात्रय आप्पा सुरवसे करीता<br>जामि-बबन नरहरी मदने यांची मिळकत | दावा रक्कम रु.२१७४५ /- दि.०१/०४/२००९ पासुन १४% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २१/०५/२०१० जप्ती नो.दि. २१/०१/२०२१ | खर्डा ता.जामखेड | ४१५ | ०.७९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| २ | कर्जदार- बाळू साहेबराव गायकवाड करीता<br>संमती-किसन साहेबराव गायकवाड यांची मिळकत<br>संमती- साहेबराव मारूती गायकवाड यांची मिळकत | दावा रक्कम रु.२०३१७२०/- दि.२५/१०/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २४/०२/२०२२ जप्ती नो.दि. २३/०७/२०२६ | जामखेड<br>जामखेड ता.जामखेडे | ११८४/१<br>११८६ | ०.००.६२<br>०.०१.२६ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३. | कर्जदार-रामचंद्र जनार्धन पेडगांवकर करिता<br>जामि- प्रकाश लक्ष्मण दिंडोरे यांची मिळकत | दावा रक्कम रु.९६२२८६/- दि.०३/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. ०७/०७/२०२३ | खर्डा ता.जामखेड | ८८/३ | १.८० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ४. | कर्जदार- मंहमद माणिक आतार करिता<br>जामि-जाफर हुसेन आतार यांची मिळकत | दावा रक्कम रु. ५१७९५/- दि.३१/०३/२०२२ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २०/०१२०२३ जप्ती नो.दि. १३/०८/२०२६ | खर्डा ता.जामखेड | २७७ | १.१९.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ५. | कर्जदार-शाहाजी नामदेव सुरवसे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ९४१९०/- दि.०१/०४/२०१७ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १२/०६/२०२४ जप्ती नो.दि. ११/०९/२०२४ | खर्डा ता.जामखेड | ३६२ | ०.०३.५० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ६. | कर्जदार- सुखदेव दशरत गायकवाड करिता<br>जामि-दत्तात्रय मुरलीधर टेपाळे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४८६३५/- दि.०१/१०/२००४ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. ०९/१०/२०२० जप्ती नो.दि. १२/०९/२०२५ | दिघोळ ता.जामखेड | १८ | ०.०.२५ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ७. | कर्जदार- खांजा आयुब शेख करिता<br>जामि-प्रविण रघुनाथ कुभार यांची मिळकत<br>जामि-शेषराव रावसाहेब येवले यांची मिळकत | दावा रक्कम रु. ६६३९३/- दि.३१/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १२/१०/२०२१ जप्ती नो.दि. ०१/१२/२०२३ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | १०४०<br>११६८ | १.१३<br>०.५० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ८. | कर्जदार- बाळु रघुनाथ भोसले करिता<br>जामि- संभाजी रघुनाथ भोसले यांची मिळकत | दावा रक्कम रु. १०३४२६/- दि.०३/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. १८/०३/२०२४ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ४९२<br>६८९ | ०.४०.००<br>०.०२.७७ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ९. | कर्जदार -शिवाजी बाळा ढेरे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ६१५५५/- दि.३१/०३/२०२१ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. ३१/१०/२०२३ | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ५२०<br>५३८<br>५३९<br>५६७ | ०.१०.७५<br>०.१३<br>०.१३<br>०.२९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १०. | कर्जदार- जनार्धन एकनाथ जनार्धन मयत हिरालाल जनार्धन जनार्धन करिता<br>जामि- प्रकाश लक्ष्मण दिंडोरे यांची मिळकत | दावा रक्कम रु. १८२०८५/- दि.३१/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १८/०८/२०२२ जप्ती नो.दि. १७/०४/२०२३ | खर्डा ता.जामखेड | ८८/१ पैकी | १.७१.०० पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| ११. | कर्जदार -सागर बाबासाहेब म्हेत्रे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ११०१०६/- दि.०१/०७/२०२४ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २१/०५/२०२५ जप्ती नो.दि. १९/०१/२०२६ | जामखेड ता.जामखेड | ७०९ पैकी | ०.५४ पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| १२. | कर्जदार -सुनिल रामभाऊ सुर्वे यांची मिळकत | दावा रक्कम रु. २९४०६५/- दि.०३/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. ३१/१०/२०२३ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | १३१<br>१४२ | ०.३३<br>१.२१ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १३. | कर्जदार -मुरलीधर चंदुलाल चव्हाण यांची मिळकत | दावा रक्कम रु. २००००/- दि.१२/०१/२००६ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. ०२/०३/२०२६ जप्ती नो.दि. १९/०५/२०२६ | खर्डा ता.जामखेड | मि.नं १०३ | ८४.५४ चौमी | मुळ नकाशा प्रमाणे |
| १४. | कर्जदार -श्रीनिवास सोनबा खैरे यांची मिळकत | दावा रक्कम रु. २९५२०८/- दि.०२/०३/२०२१ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. १९/०५/२०२६ | वाकी ता.जामखेड | १५२/२ | ०.२१.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| १५. | कर्जदार- भगवानलाल शिवलाल सुराना करीता<br>जामि-सुगंध भगवानलाल सुराणा यांची मिळकत<br>जामि-गोकुळ शाहुराव पाबळे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ५९२४७/- दि.०१/०४/२००३ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १०/०७/२०२३ जप्ती नो.दि. १५/१०/२०२४ | जामखेड<br>मोहा ता.जामखेड | नगर भुमापन क्र.२११० पैकी<br>५५९ | २०.४चौमी<br>०.६३ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १६. | कर्जदार-राजु रघुनाथ भोसले यांची मिळकत | दावा रक्कम रु. १०३६१०/- दि.०१/०४/२०१७ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १८/०८/२०२२ जप्ती नो.दि. २१/१२/२०२३ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ५२९<br>५७१ | ०.२६<br>०.९४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १७. | कर्जदार-सचिन संतराम हुलगुंडे यांची मिळकत | दावा रक्कम रु. १५८२९०/- दि.०१/०४/२०१३ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १५/१०/२०१८ जप्ती नो.दि. ०७/०२/२०१९ | चुंभळी ता. जामखेड | १५२ | ०.१३.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| १८. | कर्जदार- अनिल पोपटराव वडे करिता<br>जामि-दत्तात्रय किसन भोसले यांची मिळकत | दावा रक्कम रु. १६५५१५/- दि.०१/०४/२०१७ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२० जप्ती नो.दि. ०२/११/२०२२ | खर्डा ता.जामखेड | ६०४ | ०.४०.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| १९. | कर्जदार- सुमन विजय जाधव यांची मिळकत | दावा रक्कम रु. ७३६९६/- दि.०१/०१/२०१६ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १५/१०/२०१८ जप्ती नो.दि. ०५/०५/२०२६ | जामखेड<br>जामखेड ता.जामखेड | ११८६पैकी<br>११८६पैकी | ०.०३.००पैकी<br>०.०२.००पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २०. | कर्जदार- दिंगबर जनार्धन वाळसकर यांची मिळकत व करीता<br>जामि-दत्तात्रय शंकर गोलेकर यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३०५०१९/- दि.३१/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. ३१/०१/२०२४ | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ६१२<br>६२५<br>८९३ पैकी | ०.१३<br>०.१७<br>०.२.००पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २१. | कर्जदार- रामराव बाजीराव बिरंबळ करिता<br>जामि-अलका रामराव बिरंबळ यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४७६४०५/- दि.०१/०४/२०१३ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १५/१०/२०१८ जप्ती नो.दि. ०७/०२/२०१९ | सोनेगाव<br>सोनेगाव ता.जामखेड | ११२/२/अ<br>११२/२/क | ०.०५<br>०.५८ | मुळ नकाशा प्रमाणे |
| २२. | कर्जदार- नवनाथ रघुनाथ भोसले करिता<br>वारस- पवन नवनाथ भोसले यांची मिळकत | दावा रक्कम रु. १७८९७१/- दि.२७/०३/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २४/०२/२०२२ जप्ती नो.दि. ०५/०५/२०२६ | खर्डा ता.जामखेड | ४४१पैकी | १.०७.००पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २३. | कर्जदार- राजु ज्ञानदेव लोंढे करिता<br>जामि- सुनिल पांडुरंग लोंढे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ५३७८५/- दि.०१/०४/२००९ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १०/१०/२०११ जप्ती नो.दि. २१/०१/२०२१ | खर्डा ता.जामखेड | ४३८ | ०.९० | मुळ नकाशा प्रमाणे |
| २४. | कर्जदार- दादाराम रघुनाथ वाघमारे करिता<br>जामि- दत्तात्रय शंकर गोलेकर यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४०७७५/- दि.०१/०४/२०१७ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १८/०८/२०२२ जप्ती नो.दि. १७/०४/२०२३ | खर्डा ता.जामखेड | ८९३पैकी | ०.०२पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २५. | कर्जदार- केशव किसन भाकरे [मयत] करिता<br>वारस- छाया केशव भाकरे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ३८४९२५/- दि.३१/०३/२०२२ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २०/०१/२०२३ जप्ती नो.दि. १०/०५/२०२३ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ४५१<br>४५३ | ०.४६.००<br>०.८५.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| २६. | कर्जदार- योगेश मारुती घोडेश्वर यांची मिळकत | दावा रक्कम रु. ४०२०५/- दि.०१/०४/२०१३ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. १२/०९/२०१८ जप्ती नो.दि. ११/०४/२०२३ | साकत<br>साकत ता.जामखेड | ९७९पैकी<br>९८१पैकी | ०.२६.००पैकी<br>१.२१.००पैकी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २७. | कर्जदार- हरिश चंद्र भिकन वाडीले करिता<br>जामि- प्रभाकर रामा इंगळे यांची मिळकत | दावा रक्कम रु. ७४७२५/- दि.०१/०४/२००९ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २१/०५/२०१० जप्ती नो.दि. १७/०४/२०२३ | खर्डा ता.जामखेड | २९२ | २.४७ | मुळ नकाशा प्रमाणे |
| २८. | कर्जदार- शैला रामचंद्र पेडगावकर करिता<br>जामि- सचिन प्रदिप मेहता यांची मिळकत | दावा रक्कम रु. ८२८१५०/- दि.३१/०३/२०२१ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २३/१२/२०२१ जप्ती नो.दि. ०८/११/२०२३ | खर्डा ता.जामखेड | नगर भुमापन क्र.४७६ | २३५.१०चौमी | मुळ नकाशा प्रमाणे |
| २९. | कर्जदार- तात्या शिवाजी तनपुरे करिता<br>जामि-अशोक सुखदेव मुंगळे यांची मिळकत | दावा रक्कम रु. २६६२३४/- दि.३०/०६/२०२० पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. २४/०२/२०२२ जप्ती नो.दि. ३१/१०/२०२३ | भवरवाडी ता.जामखेड | १६१ | ०.२६.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३०. | कर्जदार- नवनाथ चंद्रभान गोलेकर यांची मिळकत | दावा रक्कम रु. २६१७५/- दि.०१/०७/२००३ पासुन १५% व्याज +इतर खर्च | मागणी नो.दि. ०९/१०/२०२० जप्ती नो.दि. ०२/०६/२०२१ | खर्डा<br>खर्डा ता.जामखेड | ७०७<br>४८० | ०.२१.००<br>०.०५.०० | मुळ नकाशा प्रमाणे |

दिनांक - ३०/०९/२०२६
स्थळ-अ.नगर

(सही)
एम.ए.शेख
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या,अ.नगर

## थोडक्यात पण महत्वाचे

### अभ्यासाबरोबर मुलांमध्ये खेळाची गोडी तयार व्हावी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

आजचे हे बाल खेळाडू उद्याचे ऑलिंपिकचे पदक विजेते असू शकतात–जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे शालेय जीवनामध्ये शिक्षण घेत असताना अभ्यासाबरोबर मुलांमध्ये खेळाची ही गोडी तयार व्हावी कारण हेच आजचे खेळाडू उद्याचे ऑलिम्पिकचे पदक विजेते असू शकतात असे मत जिल्हा क्रीडा अधिकारी श्री ज्ञानेश्वर खुरंगे यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी विद्यालय बेलवंडी येथे तालुकास्तरीय खो–खो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. शासनाने नवनवीन ९४ खेळांचा समावेश या स्पर्धांमध्ये केलेला आहे व या खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास करून जीवनाला खेळाच्या माध्यमातून नवी दिशा द्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी बेलवंडी गावचे लोकनियुक्त सरपंच ऋषिकेश शेलार, खरेदी विक्री संघाचे चेअरमन सुभाषराव काळाने, बेलवंडी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन दिनेश आबा इथापे, नागवडे कारखान्याचे संचालक सावता शेठ हिरवे, बेलवंडी पतसंस्थेचे संचालक युवराज पवार,स्कूल कमिटी सदस्य तात्यासाहेब हिरवे सर,माध्यमिक शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन दिलीपराव काटे, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री बापूसाहेब गायकवाड, सचिव पंढरीनाथ सुपेकर, महिला प्रतिनिधी वंदना अनंत्रे, तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, तालुका क्रीडा समितीचे सर्व सदस्य, उपक्रमशील क्रीडाशिक्षक श्री संदीप घावटे,सेवानिवृत्त कृतिशील शिक्षक भाऊसाहेब वाघ, क्रीडा शिक्षक, खेळाडू,बेलवंडी गावातील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी तालुक्यातील विविध विद्यालयातील १४ वर्ष वयोगटातील ४२ तर १७ वर्षे वयोगटातील ४५ संघांनी सहभाग नोंदवला.

या सर्व खेळाडूंना,दिलीपराव काटे, दिनेश आबा इथापे, ऋषिकेश शेलार यांनी शुभेच्छा दिल्या.

### कुमशेत येथून तुळजाभवानी पलंगाचा कुकडी नदीच्या नदीपात्रातून अनोखा प्रवास

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

घोडेगाव येथून दरवर्षी निघणारा तुळजाभवानी मातेचा पलंग ५५ दिवसाचा पायी प्रवासात प्रथम कुमशेत येथील कुकडी नदीच्या पात्रातून अनोखा प्रवास केला जातो. कुमशेत गावातील आई तुळजाभवानी पलंग समस्त ग्रामस्थ , जय अंबिका प्रासादिक भजनी मंडळ व पारंपारिक वाद्यसह वाजत गाजत प्रथम कुकडी नदीच्या पात्रातून पलंग उचलून पैलतीरी हापूस मार्गे प्रस्थान केले जाते. राजमाता जिजाऊ या पलंगाच्या दर्शनाला जुन्नर मध्ये येत असतात . त्यामुळे या पलंगोत्सवाला जुन्नर तालुक्यात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आई तुळजाभवानी पलंग ५५ दिवसाच्या प्रवासात १६ दिवसाचा मुक्काम जुन्नर तालुक्यात असतो . जुन्नर शहरातील तेळीवण तेली सभागृहात पलंग दहा दिवस असतो. निमदरी , तीर्थक्षेत्र कुमशेत , हापूस बाग , नारायणगाव , आळे , राजुरी या ठिकाणी प्रत्येक गावात प्रत्येकी एक दिवस मुक्काम असतो. जुन्नर तालुक्यातील तीर्थक्षेत्र कुमशेत , अहिल्यानगर – व बीड या दोन जिल्ह्यांच्या सीमा भागातून जाताना मेहकर नदीच्या पात्रातून ७ वेळा पलंग नदीच्या पहिल्या तेरी नेला जातो. त्यानंतर आष्टी तालुक्यातील तलवार नदीतून , बार्शी तालुक्यातील नारी गावातून बेडका नदीपात्रातून पलंगाचा प्रवास होतो . प्रत्येक वर्षी या पद्धतीने वेगवेगळ्या भागातून १० वेळा हा पलंग नदीपत्रातून पैलतीर अनोखा प्रवास होत असल्याची माहिती तुळजाभवानी देवीच्या पालगांचे मानकरी पलंगे यांनी दिली.



### धांदरफळ चे महात्मा फुले मित्र मंडळाचा गणेशोत्सव

संगमनेर (समर्थ गांवकरी)



संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथील महात्मा फुले मित्र मंडळाने सलग ३३ वर्षे श्री गणेश उत्सवात बालकांच्या सर्वांनी विकासावर भर देऊन अखंड परंपरा या वर्षीही टिकवली. सन १९९३ स्थापन झालेल्या मंडळांनी यावर्षी बालक ते ज्येष्ठ नागरिकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शारीरिक बौद्धिक व सामाजिक स्पर्धा घेतल्या. यात सर्व स्तरातील लोकांसाठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, मडके फोडणे, चित्र काढणे ,चित्र रेखाटन करणे, चित्र रंगविणे, रांगोळी काढणे, धावणे ,अडथळ्याची शर्यत ,पेला गोळा करून बादली टाकने, फुगा सांघिक पळविणे इत्यादी स्पर्धा वयोगटांनुसार घेऊन विजयी स्पर्धकांना शालेय उपयोगी वस्तू बक्षीस म्हणून देण्यात आल्या. मंडळाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंडळाचे संस्थापक राजेंद्र गिते सर, मॅनेजर विकास कोल्हे, अध्यक्ष अक्षय मेहेत्रे ,गणेश मेहेत्रे ,प्रमोद मेहेत्रे ,रमेश गोपाळे ,ओंकार काळे ,सचिन काळे, गोरक्ष मेहेत्रे व बालक ,महिलांचा मोलाचा वाटा आहे. मंडळातील सर्व सदस्यांना गणेश उत्सव म्हणजे एक नवीन पर्वणीच वाटते.

# तुमची परीक्षा MPSC-UPSC ची, आमची निवडणुकीची ! डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितला संघर्षातून यशाचा मंत्र

## राजकारणासाठी कर्जबाजारी होऊ नका, मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करा : डॉ.सुजय विखेंचे भावनिक आवाहन

### मेहनत, सातत्य आणि योग्य नियोजनातून यश शक्य; आमदार अमोल खताळ

संगमनेर (समर्थ गांवकरी)

तुमच्यासाठी एमपीएससी–यूपीएससीची परीक्षा आहे, तर आमच्यासाठी निवडणुकीची परीक्षा आहे. तुम्ही एकदा अपयश स्वीकारून पुन्हा यश मिळवले, तसेच मीही लोकसभेच्या निवडणुकीत पराभव स्वीकारल्यानंतर पुन्हा जनतेच्या आशीर्वादाने तुमच्यासमोर उभा आहे. प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष असतो. मात्र, सर्वसामान्य आणि गोरगरीब कुटुंबातील मुलांनी शिक्षणाच्या बळावर शासकीय सेवेत स्थान मिळवणे, यापेक्षा आनंदाचा दिवस माझ्या जीवनात दुसरा कुठलाही नाही, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील भगवतीमाळ–खंदरमळा येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये तसेच पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा जाहीर गौरव व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. कार्यक्रमास आमदार अमोल भाऊ खताळ तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र टाइम्सचे पुणे उपसंपादक प्रशांत काशिनाथ आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन जनार्दन आहेर यांनी केले. तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, सामान्य कुटुंबातील एखादा मुलगा किंवा मुलगी शिक्षण घेऊन चांगल्या पदावर पोहोचते, तेव्हा त्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी उपस्थित राहणे मला नेहमीच आनंदाचे वाटते. कारण स्वप्न पाहण्याचे धाडस आणि ते पूर्ण करण्यासाठी केलेला संघर्ष हा सोपा प्रवास नसतो.

आज संघर्ष करून अधिकारी झालेली हीच मुले उद्या मोठ्या पदांवर पोहोचतील. आपल्या गावातील एखादा व्यक्ती मोठ्या पदावर गेल्यानंतर त्याचा फायदा केवळ त्याच्या कुटुंबाला होत नाही, तर संपूर्ण गावाला आणि समाजाला होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

गावाच्या विकासाच्या मागण्यांसोबतच शाळांच्या पायाभूत सुविधांकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. शाळांच्या खोल्या, संगणक, डिजिटल बोर्ड, मुलींसाठी स्वच्छतागृहे आणि शुद्ध पाण्याची सुविधा या मूलभूत गरजा असून त्याकडेही लक्ष दिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. जोपर्यंत आपण आपल्या मुलांचा पाया मजबूत करत नाही, तोपर्यंत त्यांना उज्वल भविष्य देता येणार नाही. त्यामुळे कुठेतरी सुरुवात झाली पाहिजे आणि ती सुरुवात करण्याचा निर्णय आपण घेतला आहे, असे ते म्हणाले.संगमनेर तालुक्यातील शाळांच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी पुढील काळात प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून दरवर्षी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.



योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या पदांवर पोहोचू शकतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपली मुलं शिकवा, मुलींना शिकवा आणि त्यांना समान संधी द्या. तुमची मुलं जेव्हा मोठी होतील, तेव्हा तुम्हाला गावातील कोणत्याही पदापेक्षा अधिक सन्मान मिळेल.

## २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन

राजूर (समर्थ गांवकरी)



महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा, महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्य सरकारचे अभिनंदन करण्यात येत आहे. दुष्काळी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत शासनाने घेतलेला हा निर्णय शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा आहे.

उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही अशी भूमिका व्यक्त केली होती. शासनाच्या निर्णयातून ही भूमिका प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याचे काम राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी अजित दादा पवार यांनी पुढाकार घेऊन केले आहे.

आता कार्यकर्त्यांची जबाबदारी सुरू झाली आहे. दुष्काळ जाहीर झाला एवढ्यावर न थांबता, शासनाच्या सवलती, योजना आणि नुकसानभरपाईचा लाभ शेवटच्या पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचतो की नाही, याची पाहणी किसान सभेचे कार्यकर्ते गावोगावी आणि शेताच्या बांधावर जाऊन करतील.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे, नुकसानभरपाई, पीक कर्ज पुनर्गठन, वीजबिलातील सवलत, महसूल सवलत तसेच इतर शासकीय योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत मिळवून देण्यासाठी किसान सभा प्रशासनाशी समन्वय साधणार आहे.

## वेतन रखडल्याने वीज कंत्राटी कामगारांवर उपासमारीची वेळ

संगमनेर (समर्थ गांवकरी)

■ भविष्य निर्वाह निधी व विमा योगदान भरण्यातही विलंब; अपघातग्रस्त कर्मचाऱ्याकडे एजन्सीचे दुर्लक्ष असल्याचा आरोप

■ समस्या न सुटल्यास कामबंद आंदोलनाचा इशारा

महावितरणच्या संगमनेर विभागांतर्गत बाह्यस्त्रोत पद्धतीने कार्यरत असलेल्या वीज कंत्राटी कामगारांचे वेतन वेळेत न मिळणे, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) व कर्मचारी राज्य विमा (ईएसआयसी) योगदान भरण्यात होणारा विलंब तसेच अपघातग्रस्त कर्मचाऱ्याच्या मदतीसाठी संबंधित एजन्सीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारींमुळे कंत्राटी कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रश्नांची तातडीने दखल न घेतल्यास कोणत्याही क्षणी काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा कामगारांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे.

संगमनेर विभागातील बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांसाठी नेक्सस मल्टी सर्विसेस कॉर्पोरेशन, छत्रपती संभाजीनगर या एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, संबंधित एजन्सीकडून कामगारांच्या वेतनासह इतर वैधानिक बाबींच्या अंमलबजावणीत विलंब होत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

कामगारांच्या म्हणण्यानुसार, जुलै २०२६ महिन्याचे वेतन सप्टेंबर २०२६मध्ये अदा करण्यात आले. तसेच ऑगस्ट २०२६चे वेतन पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत अदा करणे अपेक्षित असतानाही सप्टेंबर महिन्याची २८ तारीख उलटूनही वेतन मिळालेले नसल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. अल्प वेतनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन न मिळाल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, काही कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पीएफ, ईएसआयसी भरण्यातही विलंब– वेतनाबरोबरच कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि कर्मचारी राज्य विमा (ईएसआयसी) योगदानाच्या भरण्यातही विलंब होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जुलै २०२६चे ईएसआयसी योगदान १९ सप्टेंबर २०२६ रोजी भरण्यात आल्याचे कामगारांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री मार्कंडेय शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री मार्कंडेय शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी सौ. धनश्रीताई विखे,उपमहापौर धनंजय जाधव,भाजपा गटनेत्या शारदा ढवण, नगरसेवक महेश लोंढे, दत्ता गाडळकर, नगरसेविका शितल ढोणे, जालिंदर कोतकर,

अमोल निस्ताने, रूदेश अंबाडे, मुकुल गंधे,अभिजीत बोरूडे,विकी वाघ, महेंद्र बिज्ञा,मनोज लोंढे,रोहन सानप, पुरूषोत्तम सब्बन, सिदम एस. बाळकृष्ण बालया,अशोक सब्बन, शंकरराव येमूल आदी उपस्थित होते.

धनश्री विखे म्हणाल्या विद्यार्थ्यांकडून आईवडीलांना फक्त भरपूर अभ्यास करा आपल्या पायावर उभे राहावे ही अपेक्षा असते.स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कष्ट घ्या मस्ती करा ,खेळा पण अभ्यास करा.आयुष्यात उद्दीष्ट ठरवा त्यामध्ये चार पाच पर्याय ठेवा कोणत्या गोष्टीकरीता किती कष्ट घ्यावे लागतील यांचा आतापासूनच अभ्यास करा.ध्येय पूर्ण करण्यासाठी मागदर्शक शोधा प्रत्येकात सुप्त गुण असतो तो शोधा मोठ्या शाळेत गेल्यानेच मोठे होतो असे नाही. जो जिद्दीने ठरवतो तो यशस्वी होतो. टिव्ही मोबाईल मन अस्थिर करते.तंत्रज्ञानाचा वापर आपण कसा करतो त्याला महत्त्व आहे. मोठ्यांची चरीत्रे अभ्यासा यावेळी त्यांनी पद्मश्री विखेपाटील, डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची उदाहरणे देत समजून सांगितले.

झाड फक्त लावून तर ती कशी जगतील याकडे लक्ष द्या जो वर्षभर झाड जगवेल त्याला बक्षीस मिळणार असल्याचे सांगितले.

धनंजय जाधव म्हणाले पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील व सुजय विखे पाटील हे नेहमीच पाठीशी असतात विखे कुटुंबीय प्रत्येक क्षेत्रात मदत करतात. विदयाथ्र्यांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून नये विद्यार्थी हे आईवडीलापेक्षा शिक्षकांचे जास्त ऐकतात. डॉ.राधाकृष्ण विखे ग्रीन सिटी मोहिमेला सुरुवात केली आहे. ग्लोबल वार्मिंग होत आहे डॉ .सुजय विखे व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या शहरात दीड लाख झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. शाळेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.काळोखे यांनी सूत्रसंचालन केले

## संघर्षातून निर्माण झालेले आदर्श शिक्षक देवराम दरेकर : माजी मंत्री पाचपुते

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)




संघर्षातून निर्माण झालेले आदर्श शिक्षक म्हणजे देवराम दरेकर असे राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी केले आहे ते श्रीगोंदा तालुक्यातील तांदळी येथील श्री तांदळेश्वर माध्यमिक विद्यालयातील अध्यापक तथा अहिल्यानगर माध्यमिक शिक्षक सहकारी बँकचे माजी संचालक देवराम दरेकर यांच्या प्रदिर्घ २८ वर्ष समर्पित सेवापुरर्ती सत्कार समारंभात पाचपुते बोलत होते.

प्रसिद्ध उद्योजक नवनाथ दरेकर यांनी दरेकर सरांचा जीवनपटच उलगडून सांगताना मात्र अश्रू आवरता आले नाहीत कारण जीवनात एवढा संघर्ष केला की त्यांच्या एवढा कोणीच करु शकत नाही असे ही दरेकर यांनी सांगितले.यावेळी अहिल्यानगर जिल्हा शिक्षक नेते भाऊसाहेब कचरे, प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी चेअरमन संतोष गायकवाड, राष्ट्रीय शिक्षक समितीचे अध्यक्ष आबासाहेब जगताप, श्रीगोंदा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील भोर,शारदा विद्या निकेतनचे सहसचिव माजी प्राचार्य बी टी मखरे सर, सरपंच संजय निगडे, श्रीगोंदा नगरपालिकेच्या उपाध्यक्षा सौ अलका अनभुले, अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे ,जिल्हा माध्यमिक शिक्षक सहकारी बँकचे माजी अध्यक्ष दिलीप काटे,स्कुल कमिटीचे अध्यक्ष बापूसाहेब शेळके,एन एस गुळवे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्या नयना वाळके –दरेकर, कॉलेज विभाग प्रमुख प्रा.कांचनताई कुरुमकर अग्नीफाऊडेशनचे पत्रकार बाळासाहेब काकडे, जेष्ठ पत्रकार राम सोनवणे,प्रा.सचिन जगदाळे,मुख्याध्यापक एस.एम.क्षीरसागर, जेष्ठ शिक्षक जे.के.दरेकर, अनिल कुटे, राजकीय नेते मिलींद दरेकर, कोल्हापूरचे प्रा.अमरसिंह शेळके आदि मान्यवर उपस्थित होते.

> ज्या शिक्षकांनी जीवनात संघर्ष केला आपल्या कुटुंबाचा देखील कधीच विचार केला नाही फक्त विद्यार्थ्यांचे हितच डोळ्यासमोर ठेवून पवित्र असे ज्ञानदान केले. सेवानिवृत्तीनंतर देखील संघर्ष करण्याची वेळ येते याचा कोठेतरी शासनाने विचार करून तात्काळ जुनी पेन्शन योजना लागू करावी
>
> **–प्रा.संजय वाळे**
> **जुनी पेन्शन योजना कृती समिती**
> **संगमनेर**

## छत्रपती महाविद्यालयात ‘स्टार्टअप’वर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने ‘एस.पी. पी. यु. स्टार्ट अप टॉक या लेक्चर सिरीज मधलं पहिलं लेक्चर’ चे आयोजन सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालयात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करून नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायाचे स्वरूप देण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि संधी याबाबत या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात व अतिथी परिचयात समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर कर्पे यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून स्व. शिवाजीराव नागवडे यांनी अनेक कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य केले. ते केवळ उद्योजक नव्हते, तर परिसराच्या विकासाला दिशा देणारे दूरदृष्टीचे नेतृत्व होते. त्यांचा उद्योजकीय व शैक्षणिक वारसा संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे सक्षमपणे पुढे नेत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी संशोधन आणि नवकल्पना यांचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला. संशोधनाची खरी उपयुक्तता ही माणसाचे जीवन अधिक सुलभ करण्यात आहे, असे सांगत त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधनाकडे केवळ शैक्षणिक नव्हे, तर व्यावसायिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून पाहण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील मॅरियन क्टिंग इंग्रेडियंट लिमिटेडचे संचालक डॉ. निनाद पुराणिक आणि सहसंस्थापक डॉ. अनुप देशपांडे उपस्थित होते. त्यांनी स्टार्टअप उभारणीपासून त्याच्या विस्तारापर्यंतचा आपला रंजक आणि प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, यशस्वी स्टार्टअपची सुरुवात एखाद्या कल्पनेपासून होते; मात्र केवळ कल्पना पुरेशी नसून तिचे रूपांतर उत्पादन, बाजारपेठ आणि व्यवसायाच्या संधीमध्ये करणे महत्त्वाचे आहे. एखाद्या समस्येतील ‘गॅप’ ओळखणे, त्यातून कल्पना विकसित करणे, संशोधन व विकास करणे, उत्पादन तयार करणे, त्यासाठी योग्य बाजारपेठ शोधणे आणि त्यानंतर व्यवसायाचा ‘स्केल अप’ करणे, या स्टार्टअपच्या विविध टप्प्यांची त्यांनी सविस्तर माहिती दिली.

स्टार्टअपसाठी सुरुवातीच्या काळात वेळ, भांडवल, संशोधन, प्रमाणपत्रे, परवाने, मनुष्यबळ आणि बाजारपेठेचा अभ्यास यांचे योग्य नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केवळ स्वतःच्या विषयापुरते मर्यादित न राहता रसायनशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन, शासकीय योजना आणि विविध उद्योगक्षेत्रांतील तज्ज्ञांशी संपर्क साधणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

अडचण शोधा, त्यातील गॅप ओळखा, कल्पना विकसित करा, संशोधनातून समाधान शोधा, बाजारपेठ निर्माण करा आणि




योग्य नियोजनातून व्यवसायाचा विस्तार करा, हा स्टार्टअपचा मूलमंत्र असल्याचे मार्गदर्शकांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाला नाविन्यपूर्ण कल्पनांची जोड देऊन रोजगार मागणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.नाविन्यपूर्ण कल्पनेला संशोधनाची जोड आणि संशोधनाला बाजारपेठेची दिशा मिळाल्यास विद्यार्थी केवळ नोकरीच्या शोधात राहणार नाहीत, तर स्वतःचे उद्योग उभे करून नव्या रोजगारनिर्मितीला चालना देऊ शकतील, हा संदेश या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना मिळाला.

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## नर्मदा परिक्रमेच्या आत्म्याला मुक्तीची साधना मानली जाते : राजेंद्र मुनी



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शास्त्रानुसार गंगा स्नानेन मुच्यते,नर्मदा दर्शनात म्हणजेच गंगेत स्नान केल्याने जी पाप नष्ट होतात ती पाप केवळ नर्मदा मातेच्या दर्शनानेच नष्ट होतात.नर्मदा नदीचा उगम भगवान शंकराच्या तपश्चर्येतून व घामाच्या थेंबातून झाला म्हणून तिला शिवाची कन्या व जिवित देवी मानले जाते. असे प्रतिपादन संत स्वामी राजेंद्र मुनी यांनी केले. अहिल्यानगर येथील गायत्री मंदिरात नर्मदा परिक्रमाचे संमेलन संपन्न झाले. दरवर्षा प्रमाणे पायी नर्मदा परिक्रमा करणाऱ्या परिक्रमा इच्छुक साधकांसाठी माहिती, उद्बोधन परिसंवाद आयोजित करण्यात आला होता यावेळी नर्मदा परिक्रमाचे नियम मार्ग कधी करावी याबाबत सविस्तर माहिती दक्षिण तट नर्मदाखंड हरदा जवळील हंडिया नजीक ग्राम भमोरी येथील संत स्वामी राजेंद्रमुनी यांनी देऊन सुंदर मार्गदर्शन केले. प्रथम नर्मदा परिक्रमा का करावी, महत्व याबद्दल माहिती दिली. त्यानंतर परिक्रमा काळात आश्रमात परिक्रमा करणाऱ्या साधकांनी कसे वर्तन ठेवावे हे दाखले देत स्पष्ट केले. परिक्रमा आणि पंढरपूर वारी याचा फरक स्पष्ट केला. वारी ही पांडुरंग (विठ्ठल) भक्ती साठी पुन्हा पुन्हा करावी हे सांगितले. तसेच नर्मदा परिक्रमा ही शिवपुत्री नर्मदमातेची आत्म साधना, आत्म संयम, विजनवास (एकट्याने) भक्ती साधना आहे. त्यात संसारी, प्रापंचिक साधकांनी कसा अभ्यास करत त्याग करत सेवासाधना करत परिक्रमेचे फलित सांगितले. उपस्थितांच्या प्रश्नाला उत्तर देताना संकल्प काय करावा. नित्यउपासना महत्व सांगितले. यावेळी साधकांनी शंका उपस्थित केली. त्या सर्वांना समाधान कारक उत्तर राजेंद्र मुनी यांनी दिले शेवटी श्री नर्मदा माईची आरती,अष्टक व कढाई प्रसाद वाटप करण्यात आले.

## अकोल्याच्या भूमिपुत्राला संस्कृत विषयात विद्यावाचस्पती पदवी

### डॉ. स्वप्नील सहस्त्रबुद्धे यांचा संशोधन क्षेत्रात गौरव!



अकोले (समर्थ गांवकरी)

अकोल्याचे भूमिपुत्र प्रा. स्वप्नील अनिल सहस्त्रबुद्धे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची संस्कृत विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी घोषित करण्यात आली आहे. 'नल-दमयंती' कथेशी संबंधित निषधराज नल यांनी रचलेल्या 'महाराजनलविरचितम् पाकदर्पणम्' या प्राचीन ग्रंथाचा सांस्कृतिक, वाययीन, भाषिक तसेच आयुर्वेदमूलक चिकित्सक अभ्यास या विषयावर त्यांनी संशोधन प्रबंध सादर केला. जळगाव येथील मूळजी जेठा महाविद्यालयाच्या संशोधन विभागप्रमुख तथा संस्कृत विभागप्रमुख डॉ. भाग्यश्री भलवतकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. 'महाराजनलविरचितम् पाकदर्पणम्' हा पाककला व पाकशास्त्राच्या क्षेत्रातील प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. सूर्यवंशातील ख्यातकीर्त राजा ऋतुपर्ण यांच्या दरबारात नलराजांनी या ग्रंथाचे सादरीकरण केल्याचे संदर्भ आढळतात. संस्कृत भाषेत रचलेल्या या ग्रंथामध्ये आयुर्वेदशास्त्रातील आहार, विहार आणि आरोग्यविषयक मूलभूत मूल्यविचारांचा आधार घेत विविध पाककृतींचे साहित्य, प्रक्रिया आणि उपयोग यांचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. त्यामुळे संस्कृत वाययाबरोबरच पाकशास्त्र आणि आयुर्वेदाच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.

## जोर्वे येथे आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन उत्साहात!

संगमनेर (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील समता विद्या मंदिर व शिल्प. मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व आणि लोकशाही व्यवस्थेतील त्याची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पर्यवेक्षक विठ्ठल तांबे यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकाराचे महत्त्व, नागरिकांचे अधिकार, प्रशासनातील पारदर्शकता तसेच लोकशाहीमध्ये माहिती अधिकाराची भूमिका स्पष्ट केली. ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गिते यांनी माहिती अधिकाराच्या विविध फायद्यांची माहिती देताना या अधिकारामुळे शासकीय कामकाजात पारदर्शकता वाढते, भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत होते, नागरिकांचे हक्क सुरक्षित राहतात आणि लोकशाही अधिक सक्षम होते, असे सांगितले. तसेच माहिती अधिकारामुळे जागरूक नागरिक घडण्यास मदत होते, यावरही त्यांनी प्रकाश टाकला. यावेळी भाऊराव भांगरे यांनी २८ सप्टेंबर या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य भारत हासे तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी माहिती अधिकाराबाबत अधिक जाणून घेत नागरिक म्हणून आपल्या अधिकारांची जाणीव ठेवण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# राहुरी बाजार समितीचा शेतकरीकेंद्री कारभार; विस्तारातून रोजगारनिर्मितीला चालना!

## सभापती अरुण तनपुरे : २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात!

राहुरी (समर्थ गांवकरी)

राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीने कायम शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवून कारभार केला असून, राज्यातील मोजक्या सक्षम बाजार समित्यांमध्ये राहुरी बाजार समितीचा समावेश होतो, असे प्रतिपादन बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी केले. बाजार समितीची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी उत्साहात पार पडली. यावेळी ते बोलत होते.

सभापती तनपुरे म्हणाले की, बाजार समितीने स्वनिधीतून जागा खरेदी करून विस्तार केला आहे. या जागेत व्यापारी संकुल उभारून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राहुरी सूतगिरणीची साडेतेरा एकर जागा खरेदी करून तेथेही बाजार समितीचा विस्तार सुरू आहे. भविष्यात कापूस खरेदी सुरू करून जिनिंग सुविधेचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यात येणार असून, शासकीय कापूस खरेदीचाही फायदा शेतकऱ्यांना मिळेल. सुमारे ३० वर्षांपूर्वी माजी खासदार प्रसाद तनपुरे यांच्या संकल्पनेतून कांदा लिलावाला सुरुवात झाली. आज तालुक्यात ऊस पिकानंतर कांद्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. त्यामुळे बाजार समिती आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली असून, त्यातून शेतकरी, कामगार, व्यापारी, हमाल-मापाडी यांच्यासाठी विविध योजना राबविता आल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी सवलतीच्या दरात भोजन व्यवस्था, व्यापाऱ्यांसाठी विस्तारित जागा, रस्ते, वीज, स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची सुविधा यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

डॉ. दादासाहेब तनपुरे यांनी ज्या उद्देशाने बाजार समितीची स्थापना केली, तो उद्देश साध्य होत असल्याचे समाधान आहे. संचालक मंडळात एकवाक्यता असल्यामुळे संस्थेचा कारभार प्रभावीपणे करता आला. स्थैर्य असले तर संस्था नावारूपाला येते, याचे राहुरी बाजार समिती हे उदाहरण आहे, असेही अरुण तनपुरे यांनी सांगितले. राहुरी शहरालगत पावणेतीन एकर जागा तसेच सूतगिरणीची साडेतेरा एकर जागा खरेदी करण्यात आली असून, आणखी ३१ एकर जागा खरेदी करण्याचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रेरणा अर्थ परिवाराचे संस्थापक सुरेश वाबळे, कारखान्याचे संचालक अशोक उऱ्हे, उपसभापती महेश पानसरे, संचालक दत्तात्रेय कवाणे, बाळासाहेब खुळे, गोरक्षनाथ पवार, शामराव निमसे, रखमाजी जाधव, मधुकर पवार, सुरेश बाफना, दत्तात्रेय शेळके, रामदास बाचकर, चंद्रकांत पानसंबळ, सुभाष डुक्रे, मारुती हारदे, मंगेश गाडे, शारदा आढाव, भाऊसाहेब खेवरे आदी उपस्थित होते. सचिव भिकादास जरे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले. व्यापारी लक्ष्मण गागरे, शेतकरी किशोर जाधव, भाऊसाहेब गुंजाळ, रवींद्र आढाव, विजय माळवदे, सुरेश वाबळे आदींनी चर्चेत सहभाग घेतला. सभेपुढील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.



### राहुरी बाजार समितीला २ कोटी ८९ लाखांचा वाढावा

अहवाल सालात बाजार समितीला २ कोटी ८९ लाख रुपयांचा वाढावा मिळाला आहे. डॉ. दादासाहेब तनपुरे यांनी शेतकरी केंद्रबिंदू ठेवून संस्थेची स्थापना केली. बाजार समितीने कोणतेही कर्ज न घेता स्वखर्चातून राहुरी व वांबोरी आवारात सुमारे १८ कोटी रुपयांच्या भौतिक सुविधा निर्माण केल्या आहेत. राहुरी नगर परिषदेची पावणेतीन एकर जमीन आठ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आली असून, या ठिकाणी गाळे व भाजीपाला बाजार सुरू करण्यात येणार आहे.

# राहुरी डॉक्टर्स अँड केमिस्ट पतसंस्थेतर्फे सभासदांना १५ टक्के डिव्हिडंड

राहुरी (समर्थ गांवकरी)




राहुरी तालुका डॉक्टर्स अँड केमिस्ट अर्बन को. ऑप. क्रेडिट सो. लि. राहुरीची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीचे वातावरणात पार पडली. या सभेत २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेच्या सभासदांना त्यांचे भागभांडवलावर १५ टक्के डिव्हिडंड देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. संजय माणिकचंद भळगट होते. या प्रसंगी बोलताना डॉ. भळगट यांनी सांगितले की गेली २८ वर्ष संस्थेस सलग ऑडिट वर्ग 'अ' मिळत असून दरवर्षी सभासदांना १५ टक्के डिव्हिडंड देणारी डॉक्टर्स व केमिस्ट पतसंस्था ही अहिल्यानगर जिल्ह्यातील एकमेव पतसंस्था आहे. संस्थेचा कारभार हा अत्यंत पारदर्शक व काटकसरीने करण्यासाठी संस्थेचे सर्व संचालक एकजुटीने सतत प्रयत्न करत आहेत. संस्थेची उत्तरोत्तर प्रगती साधण्यात आणि थकबाकीदार कर्जदारांकडून थकबाकी वसूल करण्याचे कामी संस्थेचे सर्व संचालकांचे अत्यंत अनमोल सहकार्य लाभत असल्याचे डॉ. भळगट यांनी सांगितले.

या संस्थेचे सभासद डॉ. सुवर्णा गोलेचा, डॉ. अक्षय भंडारी, सौ. आरती धोंडे, श्री. ज्ञानदेव काळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थेतर्फे ज्या सभासदांचे पाल्यांनी १०वी, १२वी, तसेच इतर शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविले आहे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. संस्थेमध्ये नियमित कर्जफेड करणाऱ्या कर्जदारांपैकी श्री. संजय बोगावत, श्री. महेश बनकर, श्रीमती. निर्मला साठे यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला.

सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ संचालक डॉ. दत्तात्रय वने यांनी केले. या सभेसाठी डॉ. सोपान हारदे, डॉ. चंद्रकांत गिरगुणे, श्री. सूर्यकांत भूजाडी, डॉ. महेश कोहकडे, डॉ. संजय म्हसे, डॉ. हेमा वैरागर सौ. जयश्री मोटे, डॉ. संजय गाडे, श्री. भारत भूजाडी, श्री. तनपुरे, श्री. वणे, श्री. रावसाहेब पवार, श्री. विलास धसाळ, श्री. वसंत आढाव, श्री. कांतीराम वराळे, डॉ. अरुणा भंडारी, डॉ. माधूरी वणे, डॉ. प्रवीण कोरडे. डॉ. जाकीरशेख, डॉ. राहुल बलदवा, डॉ. पूनम पवार, डॉ. झाकीर शेख, संस्थेचे सचिव श्री. बाबासाहेब शिंगोटे व संस्थेचे सर्व कर्मचारी, दैनिक धन्वंतरी ठेव प्रतिनिधी, तसेच अनेक ठेवीदार व कर्जदार सभासद उपस्थित होते.

# परिक्रमा कॉलेज ऑफ फार्मसीच्या शिरपेचात दुहेरी मानाचा तुरा

## प्रो. विलास बांगर यांचे पेटंट, तर डॉ. दीपक शेंडगे यांना पीएच.डी.

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)



काष्टी येथील मा. श्री. बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा डिप्लोमा इन फार्मास्युटिकल सायन्सेस तसेच HSBPVT's ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, फॅकल्टी ऑफ फार्मसीच्या दोन प्राध्यापकांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात दुहेरी मानाचा तुरा रोवला आहे. संस्थेचे प्रा. विलास बाळासाहेब बांगर यांच्या अभिनव संशोधनाला डिझाइन नोंदणी प्राप्त झाली असून, प्रा. डॉ. दीपक शरद शेंडगे यांनी पीएच.डी. पदवी संपादन करून संस्थेच्या संशोधनपर वाटचालीला नवी उंची प्राप्त करून दिली आहे.

प्रो. विलास बाळासाहेब बांगर यांनी विकसित केलेल्या Transdermal Foot Patch for Improving Sleep Quality या अभिनव संकल्पनेच्या डिझाइनला Design No. 407109-001 अंतर्गत अधिकृत नोंदणी मिळाली असून त्याला Granted असा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. Designs Act, २००० आणि Designs Rules, २००१ अंतर्गत झालेली ही नोंदणी फार्मास्युटिकल संशोधन आणि आधुनिक औषध-वितरण तंत्रज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी ट्रान्सडर्मल फुट पॅचच्या संकल्पनेवर आधारित हे संशोधन भविष्यातील औषधोपचार क्षेत्रासाठी उपयुक्त ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अहिल्यानगरच्या ओंकार बेद्रे यांना आंतरराष्ट्रीय छायाचित्रण स्पर्धेत द्वितीय क्रमांक

## अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा, ओंकार बेद्रे यांना १ लाखांचे बक्षीस

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर शहरातील युवा वन्यजीव छायाचित्रकार ओंकार रविंद्र बेद्रे यांनी DJ Memorial International Photo Contest (DJMPC) या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय छायाचित्रण स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत ३७ देशांमधील सुमारे १२,२०० छायाचित्रांनी सहभाग नोंदवला होता. त्यामधून ओंकार बेद्रे यांच्या द्धश डरीं`ष णी या छायाचित्र मालिकेची द्वितीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली.

ही छायाचित्रमालिका भारतीय लांडग्यांच्या (नर व मादी) जीवनावर आधारित असून, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या दुर्मीळ वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास, त्यांचे सौंदर्य आणि संवर्धनाची निकड अतिशय प्रभावीपणे अधोरेखित करते.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा तामिळनाडू येथे पार पडला.या सोहळ्यात ओंकार बेद्रे यांना १ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

# निघोजसह परिसरातील रस्त्यांना विकासाची '१५ कोटींची मंजुरी

- आठ रस्त्यांच्या प्रशासकीय मंजुरमूळे ग्रामीण दळणवळणाला गती
- आ.काशिनाथ दाते सर यांचा निघोजकरांच्या वतीने सत्कार..

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

निघोजसह परिसरातील ग्रामीण भागाच्या दळणवळणाला अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने तब्बल १५ कोटी रुपयांच्या आठ रस्ता कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील लेखाशीर्ष ३०५४ अंतर्गत गट-बमधून या कामांना मंजुरी देण्यात आली असून, त्यामुळे अनेक वाड्या-वस्त्यांना मुख्य रस्त्यांशी जोडणारा मार्ग अधिक सुकर होणार आहे.

मंजूर कामांमध्ये निघोज-कोल्हे वस्ती, वडनेर बु.-मुक्ताबाई शिव-वाकण मळा-सुकाळे वस्ती, शिववाडी-मोरवाडी-लामखडे वस्ती, कुरंद-भोसलेवाडी-नरवडेवाडी, वाजेवाडी-बाबरमळा-बो-हाडे वस्ती कॅनॉल, रसाळवाडी, वडनेर बु.-टेंभीमळा तसेच वाजेवाडी ढोकमाळ-कॅनॉल या रस्त्यांचा समावेश आहे.

ग्रामीण भागातील रस्ते हे केवळ दळणवळणाचे साधन नसून शेतीमालाची वाहतूक, शाळा-महाविद्यालयांपर्यंतचा प्रवास, आरोग्यसेवा आणि दैनंदिन बाजारपेठेशी जोडणी यासाठी महत्त्वाचे माध्यम आहेत. त्यामुळे या आठ रस्त्यांच्या कामांमुळे परिसरातील नागरिकांच्या वाहतुकीला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या मंजुरीबद्दल निघोज ग्रामस्थांनी पारनेर येथील आमदार काशिनाथ दाते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांचा शाल, श्रीफळ व रोपटे देऊन सत्कार केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद यांच्यासह चंदूशेठ लामखडे, विठ्ठलराव कवाद, बाळासाहेब लामखडे, सोमनाथ वरखडे, रोहिदास लामखडे, रमेश वरखडे, वसंत ढवन, रामदास रसाळ, पोपट रसाळ, हिराभाऊ सोनवणे, योगेश वाव्हळ, दत्तात्रय कुदळे, सुखदेव वाव्हळ, रंगनाथ रसाळ, योगेश साबळे, हरिभाऊ साबळे, खंडू भांबरे, भाऊ साळवे, भाऊ रसाळ, शहाजी लामखडे, दत्तात्रय रसाळ, संतोष शिंदे, शिवाजीराव डेरे, बाबाजी लाळगे, भरत आप्पा रसाळ, ज्योतीताई पांढरकर यांच्यासह निघोजचे ग्रामस्थ उपस्थित होते.



# पारनेर काँग्रेसमध्ये नव्या नेतृत्वाची चाहूल; ॲड. ईश्वर दिवटे यांच्या नावाची मागणी!

पारनेर (समर्थ गांवकरी)

काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक पुनर्बांधणीच्या पार्श्वभूमीवर पारनेर येथे काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक दक्षिण जिल्हाध्यक्ष किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तालुक्यासाठी नवीन तालुकाध्यक्षाची नियुक्ती होणार असल्याने बैठकीत नव्या नेतृत्वाबाबत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. पक्ष संघटना गावागावात मजबूत करण्यासोबतच नव्या कार्यकर्त्यांना संधी देण्यावर बैठकीत भर देण्यात आला. काँग्रेसच्या राष्ट्रीय पातळीवरील संघटनात्मक फेरबदलातही नव्या नियुक्त्या आणि जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे वृत्त आहे.

जिल्हाध्यक्ष किरण पाटील यांनी राहुल गांधी यांच्या ध्येयधोरणांची माहिती देताना राज्यातील विविध पदांवर नव्याने नियुक्त्या करण्यात येणार असल्याचे सांगितले. पारनेर तालुक्यातही नवीन तालुकाध्यक्षाची नियुक्ती करण्यात येणार असून, नवीन तालुकाध्यक्षांची निवड झाल्यानंतर महिला काँग्रेस अध्यक्ष, युवक काँग्रेस अध्यक्ष तसेच विविध सेलच्या तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. अहिल्यानगर जिल्ह्याचे समन्वयक ज्ञानदेव वाफारे यांनी तालुक्यातील पक्ष संघटनेचा आढावा घेतला. प्रत्येक जिल्हा परिषद गटात तालुका उपाध्यक्षांची नियुक्ती तसेच प्रत्येक गावात काँग्रेस कमिटी, महिला काँग्रेस कमिटी आणि युवक काँग्रेस कमिटी स्थापन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

ॲड. ईश्वर दिवटे यांच्या नावाची मागणी:

बाबुर्डी गावचे सरपंच ड. ईश्वर सिताराम दिवटे यांची पारनेर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी बहुसंख्य कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष किरण पाटील यांच्याकडे केली. विद्यमान तालुकाध्यक्षांना जिल्हा पातळीवर काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणीही कार्यकर्त्यांनी केली. दरम्यान, ड. रामकृष्ण पवार यांनी पारनेर येथे काँग्रेस पक्षाचे कार्यालय सुरू करण्याची मागणी केली. या कार्यालयाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना शासकीय योजनांची माहिती तसेच तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमी अभिलेख कार्यालय आदी ठिकाणच्या कामांसाठी मार्गदर्शन व मदत करता येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी ॲड. ईश्वर दिवटे यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष किरण पाटील, जिल्हा समन्वयक ज्ञानदेव वाफारे, तालुका महिला अध्यक्ष मनीषा ताई ठुबे आणि सामाजिक कार्यकर्त्या सुमन सुभाष ठुबे यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा समन्वयक ज्ञानदेव वाफारे यांनी मावळते तालुकाप्रमुख रोहकले सर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचा सत्कार केला. बाबुर्डीचे माजी सरपंच काकडे यांनी आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुका काँग्रेसने तालुक्यातील सर्व जागांवर स्वतंत्रपणे लढवाव्यात, अशी भूमिका मांडली. बैठकीस इंजिनीयर सुभाष ठुबे, आनंदा मेसे, गणीभाई शेख, निघोजचे क्षीरसागर, अरविंद लोंढे, योगेश शिंदे, अजित साळवे, सुभाष काकडे, रवि रासकर, दीपक दळवी, उपाध्यक्ष रामदास ठुबे यांच्यासह सुपा गटातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. रामदास शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती भक्कम

## ६८.९६ कोटींचा नफा, सभासदांना १० टक्के लाभांशाची शिफारस!





**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर बँकेच्या आर्थिक स्थितीचा आणि वर्षभरातील कामकाजाचा आढावा प्रशासक श्रीमती संगिता रविंद्र डोंगरे यांनी अध्यक्षीय भाषणातून मांडला. बँकेची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ रोजी झाली असून १ मे १९५८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली. समाजातील तळागाळातील घटकाला केंद्रस्थानी ठेवून बँक सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

३१ मार्च २०२६ अखेर बँकेचे एकूण ६ हजार ८७१ सभासद असून त्यामध्ये ५ हजार ९७३ सहकारी संस्था आणि ८९८ व्यक्ती सभासदांचा समावेश आहे. बँकेचे वसुल भागभांडवल ४०३.६४ कोटी रुपये आहे. बँकेकडे १,५२८.२९ कोटी रुपयांचे निधी, ११,३११.१४ कोटी रुपयांच्या ठेवी, १,४६६.५२ कोटी रुपयांची बाहेरील कर्जे, ५,७६१.१० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १५,३६७.७३ कोटी रुपयांचे खेळते भांडवल आहे. बँकेची कर्ज येणेबाकी ७,७२६.२८ कोटी रुपये असून आर्थिक वर्षात बँकेला ६८.९६ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. या नफ्यातून भागधारकांना १० टक्के लाभांश देण्यासाठी ३९.०३ कोटी रुपयांची शिफारस करण्यात आल्याचे प्रशासकांनी सांगितले.

७,७२६ कोटींची कर्ज येणेबाकी:

बँकेच्या एकूण कर्ज येणेबाकीत अल्प मुदतीची पीक कर्जे ३,८४२.२१ कोटी, मध्यम मुदतीची कर्जे ९९६.६० कोटी, दीर्घ मुदतीची कर्जे १२७.१० कोटी, कॅश क्रेडिट, पगारदार पतसंस्था व वैयक्तिक कर्जे २,७२४.८६ कोटी आणि अवसायनातील संस्थांची ३५.५१ कोटी रुपयांची येणेबाकी आहे. अहवाल वर्षात अल्पमुदत पीक कर्जासाठी २,७१४.७० कोटी आणि पशुपालनासाठी खेळते भांडवल म्हणून १९६.९५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. मध्यम मुदतीच्या कर्जांत साखर कारखाने, पाइपलाइन, ठिबक सिंचन, शेळी–मेंढी पालन, हार्वेस्टर, डेअरी विकास, संकरीत गाई व बैल खरेदी आदींसाठी ५३९.३२ कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले.

ट्रॅक्टर, घरकुल, गोदाम, शैक्षणिक कर्ज, शेततळे आदींसाठी १२.०४ कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्जवाटप करण्यात आले. जिल्ह्याच्या अर्थकारणात साखर कारखानदारीचे महत्त्व लक्षात घेऊन सहकारी साखर कारखान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी बँक सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

शेतकऱ्यांना पीक कर्जात शून्य टक्के व्याजाचा लाभ:

केंद्र आणि राज्य शासनाच्या व्याज सवलतीमुळे तीन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाचा लाभ मिळत असल्याचे प्रशासकांनी नमूद केले. बँकेच्या एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२३ अंतर्गत १६ सप्टेंबर २०२३ ते ३० जून २०२६ या कालावधीत ७१३ सभासदांनी सहभाग घेतला. त्यांना ३ कोटी १५ लाख रुपयांची सवलत देण्यात आली असून त्यातून बँकेची १३ कोटी ६२ लाख रुपयांची जुनी थकबाकी वसूल झाली आहे.

बचत गटांच्या माध्यमातून ३.४७ लाख महिला बँकेशी जोडल्या:

३१ मार्च २०२६ अखेर बँकेशी ३० हजार ५०७ स्वयंसहाय्यता बचत गट संलग्न असून ३ लाख ४७ हजार ९२३ महिला नियमित आर्थिक व्यवहाराच्या माध्यमातून बँकेशी जोडल्या गेल्या आहेत. अहवाल वर्षात एपीएल आणि एनआरएलएमच्या १५० बचत गटांना ३.०९ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि संयुक्त दायित्व गट योजनेअंतर्गत १४७ गटांना २.३८ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले.

सामान्य शेतकरी व खातेदारांसाठी सोनेतारण कर्ज सुविधेलाही बँकेने प्राधान्य दिले असून १५५ शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे. ३१ मार्च २०२६ अखेर सोनेतारण कर्जाची येणेबाकी १४६.०४ कोटी रुपये असून भविष्यात हे कर्ज ५०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले.

कर्जवसुली वाढविण्याचे आवाहन; एनपीए १२.५५ टक्के:

बँकेची कर्जवसुली ३० जून २०२५ रोजी ५१.४३ टक्के होती, तर ३० जून २०२६ अखेर ती ४५.४४ टक्क्यांवर आली आहे. कर्जवसुली कमी झाल्यास भविष्यात बँकेसमोर अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे सभासदांनी कर्जाची नियमित परतफेड करावी, असे आवाहन करण्यात आले. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचा एकूण एनपीए ९६९.६८ कोटी रुपये असून त्याचे प्रमाण १२.५५ टक्के आहे. बँकेने एनपीएसाठी ८३१.८७ कोटी रुपयांची तरतूद केली असून नक्त एनपीएचे प्रमाण निरंक असल्याचे अध्यक्षीय भाषणात नमूद करण्यात आले.

शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ९७५.९८ कोटी रुपये प्राप्त:

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत बँकेच्या २७७ शाखांमार्फत १,३६६ प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या सभासदांची १ लाख ९२ हजार २८२ कर्जखाती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली. त्यापैकी शासनाकडून प्राप्त झालेल्या दोन याद्यांमध्ये एकूण १ लाख २ हजार ५६३ सभासदांना ९७५.९८ कोटी रुपये प्राप्त झाले असून ही रक्कम लाभार्थी सभासदांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

९४६ सेवा संस्थांच्या संगणकीकरणाला गती:

केंद्र शासनाच्या प्राथमिक विविध कार्यकारी सेवा संस्था संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील १,३९७ संस्थांपैकी पहिल्या टप्प्यात ९४६ संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी ९३६ संस्थांचे ई–पॅक्स कामकाज पूर्ण झाले असून उर्वरित १० संस्थांचे काम अंतिम टप्प्यात आहे. दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ४५१ संस्थांचा समावेश करण्यात येणार आहे.

बँकेने मुख्य कार्यालयासह २८७ शाखा आणि ११ विस्तार कक्षांचे कोअर बँकिंग पद्धतीने संगणकीकरण केले आहे. एटीएम, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस, आधार आधारित पेमेंट, डीबीटी, मोबाईल बँकिंग, यूपीआय आदी आधुनिक सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बँकेचे ८८ एटीएम कार्यरत असून शाखांमध्ये मायक्रो एटीएमची सुविधाही उपलब्ध आहे.

सायबर सुरक्षेला विशेष प्राधान्य:

रिझर्व्ह बँक आणि नाबार्डच्या सायबर सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँकेने सायबर सुरक्षेच्या उपाययोजना अधिक मजबूत केल्या आहेत. डेटा सेंटर, आपत्ती पुनर्प्राप्ती केंद्र, अद्ययावत सर्व्हर, फायरवॉल, नेटवर्क उपकरणे, स्टोरेज, डेटाबेस आणि अँटीव्हायरस प्रणाली उभारण्यात आली आहे. सायबर हल्ले तातडीने ओळखण्यासाठी आधुनिक यंत्रणा कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत सहभाग: प्रधानमंत्री पीक विमा योजना, हवामान आधारित पीक विमा योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, गोडावून योजना यांसह केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची बँकेमार्फत अंमलबजावणी करण्यात आली. शेतकऱ्यांसाठी अपघात विमा योजनेअंतर्गत १८ ते ७० वयोगटातील विविध कार्यकारी सेवा संस्थांच्या सभासदांना स्वनिधीतून २० रुपये वार्षिक प्रीमियममध्ये दोन लाख रुपयांचा अपघात विमा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बँकेला ‘अ’ वर्गाचे लेखापरीक्षण:

२०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी बँकेचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झाले असून बँकेस ‘अ’ वर्ग प्रदान करण्यात आला आहे. स्थानिक लेखापरीक्षणही पूर्ण झाले असून बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करण्यात आल्याचे प्रशासकांनी सांगितले.

यावेळी बँकेला मार्गदर्शन आणि सहकार्य करणारे शासन, सहकार विभाग, नाबार्ड, रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, विविध सहकारी संस्था, साखर कारखाने, बचत गट, ठेवीदार, सभासद, शेतकरी, ग्राहक, हितचिंतक आणि पत्रकार यांचे आभार मानण्यात आले. बँकेच्या संचालक मंडळातील सहकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जनरल मॅनेजर्स, मॅनेजर्स, अधिकारी व कर्मचारी यांनी वर्षभर केलेल्या कामाचेही कौतुक करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण कृषी व औद्योगिक विकासासाठी बँकेचे कार्य पुढेही सुरू राहणार असून बँकेच्या प्रगतीसाठी सभासदांचे सातत्यपूर्ण सहकार्य मिळत राहील, असा विश्वास प्रशासक श्रीमती संगिता रविंद्र डोंगरे यांनी अध्यक्षीय भाषणाच्या समारोपात व्यक्त केला.

## महाराजा स्पोर्ट्स कबड्डी अकॅडमीचे अहिल्यानगर कुमार गट जिल्हा निवड चाचणीत उपविजेतेपद



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

माहीजळगाव, ता. कर्जत येथे दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हा कुमार गट कबड्डी निवड चाचणी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराजा स्पोर्ट्स कबड्डी अकॅडमी, श्रीगोंदाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले.

अकॅडमीच्या आदर्श पवार, श्रेयस मेहेत्रे, शिवेंद्रराजे डांगे, यशराज कुसाळकर, सार्थक हुंबे, चैतन्य वाखूरे, अथर्व लेंडकर, गणेश गावडे, ओबलेश जगताप, अभिषेक नलावडे, हर्षद भागवत व प्रथमेश नलगे या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

स्पर्धेच्या पहिल्या फेरीत माहीजळगाव संघाचा, दुसऱ्या फेरीत जी. एम. स्पोर्ट्स संघाचा तर तिसऱ्या फेरीत वाडिया पार्क संघाचा पराभव करून महाराजा स्पोर्ट्स कबड्डी अकॅडमीने अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यातील कामगिरीनंतर संघाला उपविजेतेपद मिळाले.

या खेळाडूंना प्रशिक्षक मुकेश जाधव, जुबेर बागवान, क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफळ व संदीप बिरंगळ यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल खेळाडूंचे **महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन मा. आ. बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस, मा. आ. राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, महादजी शिंदे विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, महाराजा कॉलेज प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ व डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विभागप्रमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चावंडच्या प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांचे श्रमदान

- गडकोट संवर्धनाचा संकल्प कृतीत
- खा. नीलेशलंके यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता, डागडुजीत सहभाग
- शिवकालीन वारसा जतन करण्याचा सामूहिक संदेश

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची साक्ष देणाऱ्या गड–किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संकल्प रविवारी (दि. २७) जुन्नर तालुक्यातील चावंड किल्ल्यावर प्रत्यक्ष श्रमदानातून साकारला. खासदार डॉ. निलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि ‘आपला मावळा’ संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या गडकोट संवर्धन मोहिम अंतर्गत चावंड किल्ला अर्थात प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांनी सहभाग घेत स्वच्छता व संवर्धनाच्या कामाला हातभार लावला.

या मोहिमेसाठी खासदार लंके शनिवारी रात्रीच शिवजन्मभूमी जुन्नर येथे दाखल झाले. जुन्नर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे, खासदार असूनही त्यांनी आलिशान हॉटेल किंवा रिसॉर्टमध्ये मुक्काम न करता चावंड येथील प्राथमिक शाळेत रात्रीचा मुक्काम केला. लोकप्रतिनिधीच्या या साधेपणाची परिसरात चर्चा झाली.

रविवारी सकाळपासूनच चावंड परिसरात गडकोट संवर्धन मोहिमेचा उत्साह जाणवत होता. पारंपरिक पद्धतीने खासदार लंके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. परिसरातील महिलांच्या लेझीम पथकाने लेझीमच्या तालावर सादरीकरण करीत त्यांचे स्वागत केले. पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीने मोहिमेच्या वातावरणात आणखी रंग भरला.

त्यानंतर खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली हजारो मावळे चावंड किल्ल्यावर पोहोचले. गडाच्या विविध भागांमध्ये स्वच्छता करण्यात आली. गडावरील आवश्यक ठिकाणी डागडुजी आणि संवर्धनाची कामे करण्यात आली. लोकप्रतिनिधींसह नागरिकांनीही प्रत्यक्ष श्रमदान केल्याने गडकोट संवर्धनाचा संदेश केवळ भाषणापुरता न राहता कृतीत उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.






या मोहिमेत पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे, विद्यमान सदस्या माई लांडे, सामाजिक कार्यकर्ते सूरज वाजगे, युवा नेते अमोल लांडे, सरपंच सुमन लांडे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवप्रेमी आणि हजारो मावळे सहभागी झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडित गड–किल्ल्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे यांनी खासदार लंके यांच्या गडकोट संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले. ‘आपला मावळा’ संघटनेच्या माध्यमातून या कार्यात सहभागी होऊन गड–किल्ल्यांच्या संवर्धनासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सामाजिक कार्यकर्ते सूरज वाजगे यांनीही या मोहिमेचे स्वागत केले. माई लांडे यांनी खासदार लंके यांना आपले आदर्श असल्याचे सांगितले, तर सरपंच सुमन लांडे यांनी चावंड परिसराच्या विकासासंदर्भातील विविध मागण्या खासदार लंके यांच्यासमोर मांडल्या.

गडकोट संवर्धन मोहिमेत बोलताना खासदार निलेश लंके यांनी लोकप्रतिनिधी किंवा विशेष व्यक्ती असल्याची भावना बाजूला ठेवून स्वराज्याच्या गड–किल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढे येण्याचे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची साक्ष देणारे हे गड–किल्ले जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. गडांची स्वच्छता आणि संवर्धनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा बिगुल

## पहिल्याच दिवशी ३६१ अर्जांची विक्री, राहुल जगतापांचा अर्ज दाखल!



: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असून सोमवारी झालेल्या बँकेच्या ६९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील विविध राजकीय नेते, माजी मंत्री, आमदार आणि बँकेशी संबंधित प्रमुख व्यक्ती एकत्र येऊन प्रयत्न करत असल्याचे चित्र असतानाच पहिल्याच दिवशी सभासदांनी मोठ्या संख्येने निवडणूक अर्ज खरेदी केल्याने या प्रयत्नांना धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहिल्या दिवशी तब्बल ३६१ अर्जांची विक्री झाल्याची माहिती असून श्रीगोंदा विकास सेवा संस्था मतदारसंघातून राहुल जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेला प्रशासक संगीता डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली व्यासपीठावर माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, सिताराम पाटील गायकर, अंबादास पिसाळ, रामनाथ वाघ, माधवराव कानवडे, शिवाजीराव नागवडे, गीतांजली शेळके, गणपतराव सांगळे यांच्यासह बँकेशी संबंधित अनेक प्रमुख व्यक्ती उपस्थित होत्या. मात्र काही संचालक या वार्षिक सभेला अनुपस्थित राहिल्याचेही दिसून आले. विशेष म्हणजे सभा सुरू असतानाच अनेक सभासदांनी थेट निवडणूक कार्यालयाचा रस्ता धरत अर्ज खरेदी करण्यास सुरुवात केली. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनीही वार्षिक सभा संपल्यानंतर आपल्या कार्यालयात उपस्थित राहून निवडणूक प्रक्रियेला गती दिली. मतदार यादीसाठी असलेली १,४०० रुपयांची फी भरून अनेक सभासदांनी याद्याही खरेदी केल्याने निवडणूक प्रक्रियेत सभासदांचा सक्रिय सहभाग वाढल्याचे चित्र आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी विविध राजकीय गटांमध्ये चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. एकेकाळी राजकीयदृष्ट्या परस्परविरोधात असलेले अनेक नेते निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र दिसू लागल्याने याबाबत जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रामुळे सर्वसामान्य नागरिक आणि सभासदांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. बँकेच्या निवडणुकीत पुन्हा ठराविक चेहऱ्यांनाच संधी मिळू नये, अशी भूमिका काही सभासदांकडून व्यक्त होत असून ‘वारंवार त्याच चेहऱ्यांना उमेदवारी नको’, ‘जिल्हा बँक कोणाचीही मक्तेदारी नाही’ असा सूर ऐकायला मिळत आहे.

**■ बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना सभासदांचा ‘ब्रेक’; ‘जिल्हा बँक कोणाचीही मक्तेदारी नाही’चा सूर – सर्वसामान्य सभासदांमध्ये निवडणुकीची उत्सुकता!**

जिल्हा बँकेच्या विकास सेवा संस्था, मजूर संस्था, शेतीपूरक संस्था यांसह विविध मतदारसंघांतील सभासदांनी अर्ज खरेदी करण्यास सुरुवात केल्याने निवडणुकीचे चित्र आता अधिक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. बँकेच्या कारभारात सर्वसामान्य सभासदांचा सहभाग आणि प्रतिनिधित्व वाढावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असतानाच अनेक सभासदांनी निवडणूक प्रक्रियेत उतरण्याची तयारी सुरू केल्याचे दिसत आहे. त्यामुळे सुरुवातीला बिनविरोध निवडणुकीची शक्यता व्यक्त केली जात असली तरी पहिल्याच दिवशी झालेली मोठ्या प्रमाणातील अर्ज विक्री पाहता निवडणुकीचे गणित बदलण्याची शक्यता आहे.

दरम्यान, बँकेच्या वार्षिक सभेपेक्षा निवडणुकीच्या हालचालींना अधिक महत्त्व देत काही संचालक आणि राजकीय पदाधिकारी एका ठिकाणी झालेल्या बैठकीत सहभागी झाल्याची चर्चा सभासदांमध्ये होती. दुसरीकडे, सभासदांनी मात्र वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून बँकेच्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे बँकेच्या आगामी निवडणुकीत सभासदांचा कल कोणत्या दिशेने राहणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. ‘आपकी बार, सर्वसामान्य सभासदांचे सरकार’ अशी चर्चा आता सहकार क्षेत्रात सुरू झाली असून पहिल्याच दिवशी अर्ज विक्रीला मिळालेला प्रतिसाद पाहता जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कितपत टिकते, हे आगामी दिवसांत स्पष्ट होणार आहे.

